शुक्रवार, १७ मे २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - २५८
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 17 MAY 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-258 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05

# तुमची गुंडगिरी किती दिवस सहन करायची ?

## मुंडे भावंडांवर मनोज जरांगे पाटील यांचा हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**बीड : बीडच्या नांदुरघाट गावात काल रात्री झालेल्या दगडफेकीमध्ये अनेक जण जखमी झाले आहेत. या जखमी रुग्णांची मनोज जरांगे पाटील यांनी गुरुवारी बीड जिल्हा रुग्णालयात जाऊन भेट घेतली. यावेळी त्यांनी मुंडे बहीण-भावावर हल्लाबोल केला. तुमच्याही नेत्यांना महाराष्ट्रात फिरायचे आहे. तुमची गुंडगिरी आम्ही किती दिवस सहन करायची, असा सवाल मनोज जरांगे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना केला.**

मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले की, मला सुद्धा धमकी देत आहेत, बघून घेऊ, कचाट्यात ये मारून टाकू, मला बीडमध्ये येऊ द्यायचे नाही, असे म्हणत आहेत. आता तर मी रोज बीडमध्ये येणार, दोघे बहीण-भाऊ कार्यकर्त्यांना माझ्या विरोधात पोस्ट टाकायला लावत आहेत, असा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला. मराठा आरक्षणासाठीच्या उपोषणाला नाव ठेवले, त्यावेळेस विरोध केला. पण मी एकदाही म्हणालो नाही पंकजाताईला पाडा किंवा महाविकास आघाडीचा उमेदवार पाडा. पण हे आम्हाला माहिती आहे वेळ निघून गेली की, असे होणारच. मी बलिदान देण्यासाठी तयार आहे. मात्र, मी मागे





हटणार नाही. मला बीडमध्ये येऊ देणार नाहीत तर तुमच्याही नेत्यांना महाराष्ट्रात फिरायचे आहे. तुमची गुंडगिरी आम्ही किती दिवस सहन करायची आमच्याकडेही खुंखार लोक आहेत. मराठा समाज इतका लेचापेचा नाही, तुमच्याही नेत्यांना महाराष्ट्रात आणि मुंबई, पुणे, संभाजीनगरला फिरायचे आहे. मला बीडमध्ये येऊ देणार नाहीत, असे म्हणत आहेत. मराठा समाजाचे असे उपकार फेडता का? तुमच्या व्यासपीठावर मराठा समाजातील नेत्यांना बसायला जागा नव्हती.
माझे रक्षण मराठा समाज करत आहे. मला कोणाची गरज नाही. बघू किती दिवस सहन होत आहे. ते पोलीस अधीक्षक कशामुळे गुन्हे दाखल करून घेत नाहीत? लेकरांची तडफड होते, गृहमंत्री साहेबांचे राज्य आहे का? अन्याय सुरू आहे. जात संपली की तुम्हीही संपलात, मराठ्यांच्या नेत्यांनो सावधान, आम्ही शांत पद्धतीने बघणार आहोत. बहिण भाऊ किती दिवस हल्ले करून येतात हे पाहणार आहोत. जोपर्यंत सहन होत आहे, तोपर्यंत सहन करू, पण मराठा समाजात खूप मोठी खदखद निर्माण झाली आहे, असे जरांगे पाटील यांनी सांगितले.

**मराठा समाजात खूप मोठी खदखद निर्माण झाली** : मराठ्यांची मते लागतात, मराठ्याचे नेते प्रचाराला लागतात. मराठ्याच्या मतांवर मोठे व्हावे लागते, पण अन्याय हा प्रत्येकवर्षी सुरु आहे. स्वत :चे संकट अंगावर आहे त्यावेळेस आपला सहित पाया पडतात आणि संकट निघून गेले की लगेच बदलतात. आष्टी पाटोद्यात काय झाले, बीडमध्ये काय झाले, माजलगाव आणि परळीमध्ये काय झाले हे संपूर्ण महाराष्ट्र बघतो. मराठ्यांच्या जीवावर मोठा घेऊन मराठ्यांचा जीव घ्यायचा असेल तर मराठा जीव द्यायला तयार आहे. दोघा बहीण–भावांचा विषय आहे. शेवटी मराठी मत घ्यायचे मोठे व्हायचे, कोणत्याही पक्षात राहायचे आणि मोठे व्हायचे. हा खरा अपमान मराठा नेत्यांचा आहे. जात संपली तर नेत्यांना काय किंमत राहणार?, असा सवाल जरांगे–पाटील यांनी उपस्थित केला.



# डोणगावच्या आठवडी बाजारात चालला जेसीबी

आधुनिक केसरी न्यूज

**मेहकर :** तालुक्यातील डोणगांव येथे स्थानिक आठवडी बाजारात अनेकांनी आपले छोटे मोठे व्यवसाय चालावे म्हणून अतिक्रमण करून व्यवसाय मांडले होते पण यामुळे आठवडी बाजारात अतिक्रमणाचा विळखा वाढला होता व जायला सुध्दा जागा नव्हती ठिकठिकाणी दूकाने व लोटगाडे लावून अतिक्रमण केले होते यावर डोणगांव ग्रामपंचायत च्या वतीने सर्व अतिक्रमण धारकांनी आपापली अतिक्रमण काढून घ्यावे अशी दवंडी द्वारे सुचना केली होती परंतु कुणीही अतिक्रमण न काढल्याने दि. 16 मे ला स्थानिक ग्रामपंचायत ने आठवडी बाजारात जेसीबी आणून अतिक्रमण काढण्यास सुरुवात केली यावेळी ग्रामपंचायत चे ग्रामविकास अधिकारी दिपक तांबारे व सरपंच सर्व सदस्य तसेच ग्रामपंचायत चे कर्मचारी यांनी अतिक्रमणाचे खोके आठवडी बाजारातून काढून अतिक्रमण मोकळे केले यामुळे अनेकांचे व्यवसाय कोलमडले एवढे मात्र खरे!
एवढी तत्परता ग्रामपंचायत प्रशासनाने याही प्रकरणात दाखवावी. डोणगांव येथे तब्बल 9 कोटी रुपये खर्च होऊनही राष्ट्रीय पेयजल योजनेचे काम पूर्ण झाले नाही याबाबत अनेक तक्रारी झाल्या आहेत यांचीही चौकशी होऊन संबधित कालावधीत असणारी पाणीपुरवठा समितीची चौकशी व कागदावर बनविलेल्या नाली प्रकरणी चौकशी तसेच बाहेर गावच्या ग्रामपंचायत च्या कर्मचारी यांच्या नावाने काढलेल्या पैशाची चौकशी व गावातील नाली स्वच्छता का होत नाही याबाबत चौकशी याबाबत त्वरित कारवाई चे ठराव घेऊन विकास करण्याची तत्परता दाखवावी.

# मोदींचा आत्मविश्वास ढळलाय : शरद पवार

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :**नरेंद्र मोदी यांच्याकडे दुसरं सांगण्यासारखं काही नाही. त्यामुळे ते लक्ष विचलित करण्याचे काम करत आहेत. ते सध्या जे बोलत आहेत, त्यातील १ टक्का सुद्धा काही खरं नाही. ज्यावेळी देश चालवायचा असेल, त्यावेळी जाती-धर्माचा विचार करून देश चालवता येईल का? नरेंद्र मोदी यांचा आत्मविश्वास ढळलेला आहे असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी नाशिक मध्ये पत्रकारांशी बोलताना म्हटले आहे.
शरद पवार म्हणाले की, नरेंद्र मोदी विचारतात, की मी काय केलं? पण १० वर्षांचा त्यांचा स्वतःचा अनुभव घेतला, तर ते ज्या वेळेस गुजरातचे मुख्यमंत्री होते, त्यांच्या राज्यातील शेतीचा कोणताही प्रश्न असला तर ते माझ्याकडे यायचे, मला घेऊन गुजरातला जायचे. वेळी असं झालं, की मी इस्त्राईलला चाललो होतो आणि मोदींनी मला फोन केला. अमेरिकेने त्यांचा त्यावेळेस VISA नाकारला होता. त्यांनी सांगितलं, मला इस्त्राईलला तुमच्याबरोबर यायची इच्छा आहे, मी त्यांना घेऊन गेलो. तिथल्या कृषी गोष्टी त्यांना ४ दिवस दाखवल्या. आज हे सगळं माहीत असताना हल्ली ते जे बोलतात, ते माझ्या मते राजकारण आहे दुसरं काही नाही. ते जेव्हा मुख्यमंत्री होते, तेव्हा त्यांना राज्याच्या विकासामध्ये इंटरेस्ट होता, आता त्यांना राजकारणात इंटरेस्ट आहे. असे शरद पवार साहेब म्हणाले.
शरद पवार पुढे म्हणाले की, बजेटबद्दल नरेंद्र मोदी यांचे मूर्खपणाचे स्टेटमेंट आहे. बजेट हे कोणत्या जाती धर्माचे नसते, पार्लमेंटमध्ये जे बजेट मांडले जाते, ते देशाचे असते. असे असताना ते जे सांगत आहेत, की मुस्लिमांचे वेगळे ते कधीही होत नाही व होऊ शकत नाही, असेही शरद पवार यांनी सांगितले आहे. सविस्तर बोलताना शरद पवार म्हणाले की, मुंबईसारख्या शहरामध्ये 'रोड शो' अरेंज करणं हे शहाणपणाचे लक्षण नाही. लोकांना तासनतास थांबावं लागतं, ट्रॅफिक कंडिशन भयंकर होत असते.

# स्वामी समर्थ अर्बन क्रेडिट को-ऑप. सोसायटीचा भव्य शुभारंभ


आधुनिक केसरी न्यूज

**ज़ैनुल आबेद्दीन**

**मेहकर :** बुधवार, दि.१५ मे रोजी स्वामी समर्थ अर्बन क्रेडिट को.ऑप.सोसायटीचा भव्य शुभारंभ श्री. प.पू.ष.ब्र. १०८ सद्गुगुरु सिध्द चैतन्य शिवाचार्य महाराज श्रीक्षेत्र साखरखेर्डा यांच्या वाढदिवसाच्या अभिष्टचिंतन सोहळ्या निमित्त त्यांच्या शुभहस्ते श्री स्वामी समर्थ अर्बन को.ऑप क्रेडिट सोसायटी लि.मेहकर मुख्यालय डोणगांवचा भव्य उद्घाटन सोहळा थाटात संपन्न झाला.
यावेळी श्री.प.पू.ष.ब्र.१०८ सद्गुरू सिध्द चैतन्य शिवाचार्य महाराज श्री.क्षेत्र साखरखेर्डा यांच्या हस्ते शाखेचे पुजन करून फित कापुन उद्घाटन सोहळा पार पडला. बुधवारी श्री.प.पू.ष.ब्र.१०८ सद्गुरू सिध्द चैतन्य शिवाचार्य महाराज यांचा वाढदिवस असल्यामुळे स्वामी समर्थ अर्बन को.ऑप.सोसायटीचे अध्यक्ष अंकुश अनिल आलेगावकर यांनी सहपरिवार त्यांचा वाढदिवस साजरा करून अभिवादन केले. या सोहळ्याला राजकीय, सामाजिक, शैक्षनिक स्तरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शिवसेना डोणगाव जि.प. माजी सभापती राजेंद्र पळसकर, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष शैलेश सावजी, संपतराव देशमुख, ॲड. रामेश्वर पळसकर, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे माजी तालुका अध्यक्ष वसंतराव देशमुख, निंबाजी पांडव, हेमराजजी शर्मा, विनोद भाऊ बोंडगे, उत्तमराव प्रमाळे, पिंटू पांडव,माजी उपसरपंच जोईद खान पठाण, उपसरपंच शामा इंगळे, श्रीराम ग्रामीण पतसंस्थेचे अध्यक्ष दीपक पाटील आखाडे, विठ्ठल




रुक्माई शिक्षण संस्था डोणगाव चे प्राचार्य आत्माराम दांदळे, अफसर भाई बेग, सैय्यद अब्बास भाई नागापुर, चिखली अर्बन बँकेचे शाखा व्यवस्थापक बाजाड साहेब, राजेशजी सारडा, राजकुमार सारडा, सुरज दिनोरे, संदिप भाऊ महाजन मेहकर, शिवा आपा कापसे, अनिल गायकवाड, फकिरा काळे, सुनिल भैया जैस्वाल, संदीप महाजन, मनोहर महाजन, बालु स्वामी महाराज व सुरज स्वामी गजानन आखाडे, अनिल आलेगावकर, मुरलीधर आप्पा फिसके आदी मान्यवर यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे संचालन प्राध्यापक गजानन सातपुते यांनी तसेच आभार प्रदर्शन स्वामी समर्थ स्वामी समर्थ शाखेचे उपाध्यक्ष सुरेश फिस्के यांनी केले. यावेळी बँकेचे सर्व संचालक मंडळ कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी


मग पुण्याहून अकरा डिसेंबरचं रेल्वेचं आरक्षण केलं. रेल्वे पुण्याहून भलत्याच वेळेला म्हणजे रात्री १ वा. त्यातही गडबड अशी झाली की आमच्या सुमार बुद्धीनुसार आम्ही ती गाडी रात्री अकरा तारखेला म्हणजेच अकरा तारखेच्या रात्री एक वाजता आहे असे मनात पक्कं धरून चाललो होतो. त्यानुसार अकरा तारखेला रात्री घरून बारा वा निघून स्टेशनवर पोहोचू असे मनाशी ठरवले पण होते. पण तसे गेलो असतो तर रात्री बारा नंतर बारा तारीख लागली असती. आणि आमचेच बारा वाजले असते. आणि मग ' आता जाऊ द्या ना घरी, आता वाजले की बारा ' असं म्हणायची वेळ आली असती. पण आमचे नशीब बलवत्तर ! आमच्या सुनबाईने आमच्या लक्षात ही गोष्ट वेळीच आणून दिल्यामुळे पुढील अनर्थ टळला. आम्ही बरोबर १० तारखेच्या रात्री बारा वाजता घरून निघालो आणि अकरा तारखेची म्हणजेच रात्री एकची गाडी पकडली. असं होतं आमचं. मनात सारखा एकच विचार. कसं हुईल, काय हुईल ? रेल्वे गाडीत बसल्यानंतर तिने वेग घेतला आणि तिच्या तालात मला ' कसं हुईल, काय हुईल ' हेच वाक्य ऐकू येऊ लागले. लांबचा पल्ला तर होताच. मग आठवू लागलं प्रा.लक्ष्मण देशपांडे यांचं ' वऱ्हाड निघालं लंडनला ' हे एकपात्री नाटक. त्याचे ऑडिओ सुद्धा निघाले आहेतच. पण ते पाहण्यात जास्त मजा येते. काय विलक्षण ताकदीचा माणूस म्हटला पाहिजे हा ! एकाच वेळी एकाच व्यक्तीने रंगमंचावर ५२ पात्रांची भूमिका करणे हे सोपे काम निश्चितच नव्हे.




## हितगुज



पुष्प ६५वे



**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**

## युवकांपुढे अनेक प्रश्न

युवा पिढीचे भविष्य अंधारलेले आहे. शिक्षणाविषयी अनास्था, भरकटलेले सामाजिक वातावरण, चुकीच्या मार्गातून फोफावत जाणारा चंगळवाद, बदललेले आदर्श, संकल्पना व मूल्य, दिखाऊ व तकलादू प्रतिष्ठा, शोषणाचे छुपे साम्राज्य, बेकारी, असहायता यांनी ग्रासलेली युवा पिढी ही सर्वात मोठी चिंता आहे. व्यसनाधीनता, अपराध वाढत आहेत. या पिढीला सावरण्यासाठी दिंडोरी सेवामार्गाने वेगवेगळी जी अभियाने सुरू केली आहेत, त्यापैकी एक म्हणजे युवा-अभियान होय. या युवा-अभियानात युवकांना मानसिक बळ, धैर्य, आत्मविश्वास, श्रद्धेची सकारात्मकता तर दिली जाते. पण व्यसनमुक्ति, संघटित उद्योग, लोककल्याणकारी चळवळीत त्यांचा सहभाग, बालसंस्कार, युवा-प्रबोधन, ज्ञानगंगासारख्या उपक्रमात त्यांचे नेतृत्व आहे. भारतामध्ये मनुष्यबळ जसे मोठ्या प्रमाणात आहे. तसे त्याचा शोषणमुक्त विनियोग, उपाययोजना करण्याची यंत्रणा, पद्धती विकसित झालेली नाही. प्रत्येक बाबतीत सरकारवर अवलंबून राहण्याची वृत्ती बदलणे गरजेचे आहे. त्यासाठी नेतृत्व करण्याचे सामर्थ्य आध्यात्मिक चळवळींमध्ये व लोकल्याणाची कास धरणाऱ्या धार्मिक संप्रदायांमध्ये आहे. स्वामी विवेकानंदांनी राष्ट्र घडविण्यासाठी युवाशक्तीची उभारणी केली. संत रामदासांनी हनुमंताच्या उपासनेतून युवा पिढीला शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक बळ प्राप्त करून दिले. त्यांना एकात्मतेचे धडे दिले.

वैश्विकीकरणाच्या बेधुंद वातावरणात युवा शक्तीचा र्‍हास होत आहे. सोळाव्या वर्षी 'ज्ञानेश्वरी' सांगणाऱ्या ज्ञानदेव माऊलींच्या महाराष्ट्रातील युवकांना ज्ञानेश्वरीचा एक अध्याय समजून घेणेही जड जाते आहे. भावना बोथट झालेल्या आहेत. बुद्धी सुखाकांक्षेने दबली आहे. मने दुबळी झाली आहेत. व्यवहार फसवे व मूल्ये तकलादू झाली आहेत. अशा वेळेला युवकांना कर्माच्या, श्रद्धेच्या आधाराने 'माणूस' म्हणून खंबीरपणे उभे करण्यासाठी भविष्य उज्ज्वल करण्यासाठी सामाजिक जागृतीचा ध्यास घेऊन काम केले पाहिजे. ही स्वकर्म कुसुमांची ओंजळ श्री स्वामी महाराजांना अधिक आवडते. वेदाचे परब्रह्म भक्तीच्या क्षेत्रात ईश्वर म्हणून विराजले. श्रीराम, कृष्णाच्या रूपाने ईश्वर अखिल जगाचा पाठीराखा व मार्गदर्शक झाला. तोच ईश्वर आता जनताजनार्दन बनला आहे. दीन-दुःखितांचे अश्रू पुसणे व त्यांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता व हातात आशापूर्ण सक्रियता निर्माण करणे, यासाठी न्यूनगंडांचा व संकोचाचा त्याग करून सेवेकर्यांनी सक्रीय व्हावे, जे सुरू आहे ते काम, त्यातील संदेश प्रत्येक मानवापर्यंत जागवून श्री स्वामी महाराज प्रत्येक हृदयात अधिष्ठित करावेत.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

## श्री साईबाबा

आधुनिक केसरी

श्रीसाईबाबा हे संत-परंपरेतील एक अवतारी सत्पुरुष आणि अवलिया विभूती होते. काही भक्त बाबांना रामाचा अवतार मानतात तर



काहीजण कृष्णाचा अवतार मानतात. जया मनी जैसा भाव! तया तैसा अनुभव या वचना प्रमाणे साईबाबांनी आपल्या भक्तांना दत्त, राम, कृष्ण, विठ्ठल अशा विविध देवतांच्या रुपात दर्शन दिले आहे.ते स्वतःला मात्र अल्लाचा बंदा आहे असे म्हणवून घेत. श्रीसाईबाबा हे भक्तांना सहज संवादातून बोध करीत.बरेच वेळा त्यांचे बोलणे गूढ व अतर्क्य वाटे. इंग्रजी राजवटीच्या काळात अंधश्रध्दा फार होत्या त्याच वेळी भारतीय वेदविद्यांचाही प्रसार होत होता.खुद्द लोकमान्य टिळकांनीही श्रीसाईबाबांचे दर्शन घेतले होते.आधूनिक संतकवी दासगणू महाराज हे त्यांचे शिष्य होते. त्याच्या असंख्य लीला पोथीत वर्णन केल्या आहे.कोणाची निंदा करु नये,सत्याने वागावे,भुकेलेल्याला अन्न व तहानलेल्याला पाणी द्यावे, कोणाचा द्वेष,मत्सर हेवादावा करु नये. अहंकार असू नये,अडलेल्याला परोपकारी वृत्तीने मदत करावी, ईश्वरी सत्ता श्रेष्ठ मानून नेहमी ईश्वराचे स्मरण करावे असा उपदेश त्यांच्या लीलांमधून स्पष्ट होतो. जा-धर्म,पंथ-सांप्रदाय उपासना पध्दती असे कोणतेही भेद त्यांना मान्य नव्हते. सबका मालिक एक हा त्यांचा संदेश प्रसिध्दच आहे.त्यामुळे शिख, हिंदू, मुसलमान, पारशी अशा सर्व समाजातीललोक त्यांचे भक्त आहेत . श्रीसाईबाबा आपल्या भक्तांना उपदेश करतांना सांगत, "साधे सरळ,प्रामाणिक पणे कष्ट करुन रहावे,नीतीने धन कमवावे,गरजूंना मदत करावी,वादात व्यर्थ तोंडाची वाफ दवडण्यापेक्षा अंतःकरणात परमेश्वराचे स्मरण करुन ओठातून त्याचे नाम घ्यावे. श्रध्देने आपल्या धर्मग्रंथांचे वाचन करावे,सतत आपल्या दैवताचे नामस्मरण करावे आणि माणुसकीने वागावे, किडा, मुंगी, प्राणी या सर्वामध्ये परमात्मा लपलेला आहे. मनातील, हृदयातील ईश्वरावर नामाची धार अखंड ठिबकू द्या" जगाला मानवतेची, विश्वबंधुत्वाची शिकवण देण्याचे महान कार्य बाबांनी केले. १८५० च्या सुमारास गोदावरी तटी,शिरडीमध्ये श्री साईबाबांचे वास्तव्य होते. सतत ते परमेश्वराचे नामस्मरण करीत, "अल्ला मालिक ! हरी हरी" रोगग्रस्तांना ते वनऔषधी देत. नंतर ते म्हणतात, "हरी, हरी म्हणता तो परमेश्वर माझे सद्गुरु प्रसन्न झाले, माझ्या हातून साधा अंगारा दिला तरी तो अमृत होई, ती परमेश्वराची लीला." श्री साईबाबांना ज्या व्यक्ती अनन्यभावे शरण गेल्या त्यांचे ऐहिक जीवन सुखकर झाले, मनःशांती लाभली, त्यांचेमरण सुध्दा सूर्यास्तासारखे सहज विनासायास लाभले. श्रीसाई म्हणजे साक्षात ईश्वर होय, पूर्वी, आज आणि उद्या ही त्यांच्या कृपेची प्रचिती! लाखो अनुभव, कोट्यावधी लीला!श्रीसाईबाबा फकिरी वृत्तीचे अवलिया होते. मानवाच्या सुखाचे सार त्यागात, प्रेमात, आपलेपणात, परमेश्वराच्या नामस्मरणात आहे असा त्यांचा उपदेश आहे. श्रीसाईबाबा इ. स. १९१८ मध्ये देहरुपाने अनंतात विलीन झाले पण त्यांचे अस्तित्व आजही जाणवते.



आधुनिक केसरी


## उजळे अंबर | त्रिकाळाचे ||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

**तिमिराची गाठ | सुटता सुटेना ||**
**वाट सापडेना | प्रकाशाची ||१||**
**अहंकारा ठायी | अज्ञान पोसीले ||**
**आणि नशविले | आयुष्याला ||२||**
**आंधळ्याच्या हाती | सापडला दीवा ||**
**तैसा जन्म देवा | मज झाला ||३||**
**अनाहत टाळ | वाजता अंतरी ||**
**देहचि पंढरी | झाला आता ||४||**
**संत कृपादाने | फिटला अंधार ||**
**उजळे अंबर | त्रिकाळाचे ||५||**

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**प्रकृति योग वह सुख नहीं,**
**वह सुख प्रकृती पार ।**
**सुख स्वरुप मायू गजै, उलटि गगन धरु धार ।।४०।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल पंचम अध्याय) ०४/०५/४०**
**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
**मायेच्या संबंधाने ते सुख प्राप्त होत नाही. जेव्हा आत्मा मायेच्या सीमेचा त्याग करून आपल्या शुद्ध स्वरूपात येतो, तेव्हा तो त्या सुखास प्राप्त करतो. ते ब्रह्मसुख प्रकृतीपार आहे. आनंद स्वरूप परब्रह्म प्रकाशमान आहे. आत्मा आपल्या चेतन शक्तीला धारण करून ऊर्ध्वमुख होतो आणि जेव्हा गगनात प्रवेश करतो तेव्हा तो त्या अमृत ब्रह्मसुखाला प्राप्त करतो.**


.............................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# नाम हेच प्रपंच सुखी करण्याचे साधन ।

आधुनिक केसरी

संसारातील सार । आपला करावा रघुवीर ॥ कलि अत्यंत मातला। नीतिकर्तव्याचा विसर पडला ॥ अनाचार होतसे फार । आता नाही रामावाचून दुजा ठाव ॥ चोराने घरफोड केले । मग जागृतीचे कारण नाही उरले ॥ म्हणून असावी सावधान वृत्ति । अखंड राखावी भगवंताची स्मृति॥ भगवंतासी अनन्य होता । दुःखाची नाही तेथे वार्ता ॥ अभिमानवृत्ति सोडावी बरी । त्यास घडे रामसेवा खरी ॥ सरे मीपणाची उरी। ब्रह्मरूप दिसे चराचरी ॥ म्हणून ज्याने जन्माला घातले । ज्याने आजवर रक्षण केले ॥ तो माझा धनी हे ठेवून चित्ती । भावे भजावा रघुपति ॥ रामाचे व्हावे आपण । राम जोडावा आपण ॥ हेच जन्माचे । प्रपंचाचे, मुख्य कारण ॥ म्हणून रामाविण न मानी कोणी त्राता । धन्य त्याची माता पिता ॥ प्रपंच तसा परमात्म्यावाचून। हे जसे अलंकार सौभाग्यावाचून ॥ अलंकार सर्व घातले । पण सौभाग्यतिलक न लावले । तैसे रामाविण राहणे । आहे खरे ॥ ऐहिक आणि पारमार्थिक । न जाणावे एकाहून एक परते



॥ ऐहिक आणि पारमार्थिक सुख। रामावाचून नाही देख ॥ म्हणून शुद्ध असावे आचरण । तसेच असावे अंतःकरण । त्यात भगवंताचे स्मरण । हेच प्रपंच सुखी करण्याचे साधन ॥ रामचरणावर ठेवावा विश्वास । हेच परमार्थाचे भांडवल खास ॥ ऐहिक वागण्यात रामाचे स्मरण । हीच परमार्थाची खरी शिकवण ॥ माझे हित भगवंताचे हाती । हीच ठेवावी मनाची प्रवृत्ति॥ राम कर्ता ही असावी भावना । तो जे करील ते आपल्या हिताचे जाणा ॥ भाव ठेवावा रामापायी। पण व्यवहार चुकू न देई ॥ परमात्म्याचे राखणे अनुसंधान । हाच परमार्थाचा मुख्य मार्ग जाण ॥ बाह्यांगाने करावी प्रपंचाची संगति । चित्ती असावा एक रघुपति ॥ प्रयत्न करणे आपल्या हाती। यश देणे भगवंताचे हाती ॥ प्रयत्नाला न पाहावे पुढे मागे । परि परमात्मा उभा आहे मागे। ही ठेवावी जाणीव मनामध्ये ॥ प्रपंचात दक्षतेने वागत जावे । धीर सोडू नये । भगवंताचे आधारावर निभ्रांत असावे ॥ सर्व कामधंदा घरी करी । पण चित्त लेकरांवरी । ऐसे जैसे करी जननी जाण। तैसे वागावे आपण । काया गुंतवावी प्रपंचात । मन असावे रघुनाथात । नीतिधर्माचे आचरण । पवित्र असावे अंतःकरण । त्यात कर्तव्याची जोड पूर्ण । त्या सर्वात राखता आले अनुसंधान । तर याविण दुजा परमार्थ नाही जाण ॥ व्यवहार उत्तम प्रकारचा केला । पण परमात्मा विसरला । तो व्यवहार दुःखच देता झाला ॥

**१०. जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदुःखाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील.**

## विकल्पनिरसन



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आधुनिक केसरी

कारण जगात सर्वांचा विचार करायला हवा ही तर संतांची शिकवण आहे मी एकटा खरा किंवा गर्व करणे हे संतांना अजिबात आवडत नाही. सगळ्यांचे म्हणणे खोटे व माझे म्हणणे खरे असे वागु नये. म्हणुन समर्थ याठिकाणी आपल्याला सांगतात की ज्याला आत्मज्ञान होते तो मुक्त होतो. इतरांना जन्ममरणाच्या फेरीतून सुटका करून घ्यावी असा हा सिध्दांत आहे. आपण समासाच्या मध्य भागात आलो आहोत. आत्ता पर्यंतचा अभ्यास केला तर असे लक्षात येते की ज्ञानी पुरूषास वाटते की सगळेचं ज्ञानवंत आहेत. पण मुक्त पणा ज्ञानवंत हे दोन्ही एकमेकांना पुरक विषय आहेत. कारण ज्ञानवंताला सगळं जग बंधनमुक्त वाटते. पण समाजातील अंधकार एवढा असतो की कुणाचा पायपोस कुणालाही नसतो.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, १७ मे २०२४
adhunikkesari.com

# महाराष्ट्र साहित्य परिषदेची वार्षिक ग्रंथ पारितोषिके जाहीर

## २६ मे रोजी साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांच्या हस्ते वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** महाराष्ट्र साहित्य परिषदेची विशेष ग्रंथकार पारितोषिके जाहीर झाली आहेत.रमेश चव्हाण (विसाव्या शतकातील मराठा समाज), दीपक घारे (कला-समाज-संस्कृती), विक्रम भागवत (झोका), देवा झिंजाड (एक भाकर तीन चुली), समीर गायकवाड (झांबळ), स्नेहा अवसरीकर (बारीक-बारीक आवाज वाढत चाललेत), करुणा गोखले (ऐसपैस गप्पा नीलमताईंशी), डॉ. केशव सखाराम देशमुख (भाषा आणि संस्कृती), पंकज भोसले (हिट्स ऑफ नाइन्टी टू), डॉ. गजानन सीताराम शेपाळ (रंगसभा), नेहा भांडारकर (मीमांसा आणि (प्रे) श्रेयसचा वेध), पी. विठ्ठल (संभ्रमाची गोष्ट), रजिया सुलताना (रजनी ते रजिया), उज्ज्वला बर्वे (माझा ब्रँड आजादी), डॉ. प्रमोद पाठक (पुरातत्त्वावर वेदमुद्रा), डॉ. श्रीधर पवार (ब्लॅक पॅन्थर), डॉ. विनायक गंधे (साहित्य : अभिजात आणि लोकप्रिय), संजय आर्वीकर (आत्म-प्रकाश), रविमुकुल संपादक (मराठी भावसंगीत कोश-खंड १ व २), डॉ. वंदना रवींद्र घांगुर्डे (मराठी संगीत रंगभूमी), रमेश ओझा, श्याम पाखरे (नोआखाली-माणुसकीचा अविरत लढा), विजय धोंडीराम जाधव (शिवार), स्वानंद बेदरकर(संपादक) (शब्द कल्पिताचे न पाठवलेली पत्रे), दीपाली दातार (पैस प्रतिभेचा), दिलीप नाईक निंबाळकर (अंत्राळी), गौरी रत्नपारखी (रूम नं. ६), प्रसाद तारे (छत्रपती शिवाजी महाराज : व्यक्तिमत्त्वाचे भावदर्शन), सावित्री जगदाळे (उजळपरी-गद्य), डॉ. सुरेश सावंत (एलियन आला स्वप्नात-पद्य), रविबाला काकतकर (आत्मसामर्थ्य – मंत्र प्रतिसादांचा), विनायक कुलकर्णी (अर्थमेळ), अपूर्वा प्रदीप जोशी (आर्थिक गुन्हेगारीचे अंतरंग हर्षद ते हिंडनबर्ग), अनिता पाध्ये (प्यार जिंदगी है !), डॉ. अविनाश भोंडवे (स्वास्थ्य संवाद), डॉ. जयदेव पंचवाघ (न्यूरोसर्जरीच्या पाऊलखुणा), क्रांती हरेश पैठणकर(प्रबंध) (निवडक सामाजिक कार्यकर्त्या स्त्रियांची आत्मकथने : एक अभ्यास), डॉ. शांताराम गायकवाड (वासराचे व्यावसायिक संगोपन) या मान्यवर लेखकांच्या ग्रंथांना ही पारितोषिके जाहीर झाली आहेत. रोख रक्कम आणि सन्मानपत्र असे या पारितोषिकाचे स्वरूप आहे. ही पारितोषिके २६ मे रोजी सकाळी ११.०० वा. एस. एम. जोशी सभागृहात ज्येष्ठ साहित्यिक आणि साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहेत. अशी माहिती महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी दिली. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉ. रावसाहेब कसबे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमाला परिषदेच्या विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष डॉ. शिवाजीराव कदम, कार्यकारी विश्वस्त डॉ. पी. डी. पाटील, विश्वस्त यशवंतराव गडाख, उपाध्यक्ष डॉ. तानाजीराव चोरगे, राजीव बर्वे आणि विद्याधर अनास्कर उपस्थित राहणार आहेत.

# अनधिकृत आणि धोकादायक होर्डिंग बाबत धाराशिव जिल्ह्यात कारवाई होणार का ?

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** शहरासह जिल्ह्यातील विविध परिसरामध्ये राजकीय, विविध कंपन्या, नविन मॉल शुभारंभ, क्लासेस, व्यावसायिक, हॉस्पिटल, सौंदर्य प्रसाधने अशा विविध भव्य-दिव्य असणाऱ्या या होर्डिंगमुळे धाराशिव शहरासह जिल्ह्यामध्ये नुसता विळखा घातला आहे. विविध झाडावर खिळे मारून जाहिरातीचे छोटे बोर्ड, विद्युत पोलवर, वर्दळीच्या ठिकाणी चौकामध्ये मोठ मोठ्या होर्डिंग्समुळे मुंबई प्रमाणे आता ग्रामीण भागात सुद्धा अपघात होण्याची शक्यता नागरिकांमधून वर्तविली जात आहे.

शहरातील वरदळीच्या ठिकाणी शाळेजवळ बहुतांश होल्डिंग या विद्युत पोलला बांधलेले आहेत. ह्या होर्डिंगच्या बांधणीसाठी वापरलेले लोखंडी अँगलमध्ये त्या विद्युत पोल वरुन करंट येण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे होर्डिंग शाळकरी मुलांच्या तसेच नागरिकांच्या हाताला सहज लागण्याच्या उंचीवर आहेत. त्यामुळे येथे संभाव्य धोका लक्षात घेऊन नगरपालिकेने त्वरित कारवाई करण्याची गरज आहे.



मुंबईतील घाटकोपर येथे वादळी पावसात होर्डिंग पडून आत्तापर्यंत १७ जणांचा मृत्यू झाला आहे. गुरुवारी दुपारी जोरदार वादळी वारे व पावसामुळे अनेक होर्डिंगचे कापड फाटून रस्त्यावर आले. तर काही होर्डिंग ह्या चालू विद्युत पुरला लटकून पडलेल्या अवस्थेमध्ये तशाच आहेत. नगर पालिकेने यासंबंधीचा धोका ओळखून लागलीच कार्यवाहीला सुरुवात केली पाहिजे. शहरातील धोकादायक होर्डिंग व अनेक होर्डिंगचे सांगाडे अशा आवकाळी पावसाच्या वातावरणामध्ये लवकरात लवकर शहरातील अनधिकृत होर्डिंग काढून जीवित हानी होणार नाही. याची दक्षता घ्यावी, असे नागरिकांमधून बोलला जात आहे.

# राम सातपुतेंविरोधात आचारसंहिता भंगाचा अहवाल पुन्हा पाठवणार

आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** राम सातपुते यांनी केलेल्या कथित जातीय चिथावणीखोर विधानामुळे आदर्श आचारसंहिता भंग झाल्याबाबत आचारसंहिता नियमावलीत दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार नव्याने अहवाल पाठविण्याच्या सूचना राज्य निवडणूक आयोगाने दिल्या आहेत. त्यानुसार सातपुते यांच्याकडून झालेल्या आचारसंहिता भंगप्रकरणी निवडणूक आयोगाकडे पुन्हा नव्याने अहवाल पाठविण्यात येणार आहे. सातपुते यांनी निवडणूक प्रचार काळात मशिदींमधून काँग्रेसला मतदान करण्यासाठी फतवे निघाले आहेत, असा आरोप केला होता. या आक्षेपार्ह विधानाप्रकरणी त्यांच्या विरोधात कारवाई करण्याची मागणी काही संघटनांनी निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे केली होती. त्याची दखल घेऊन निवडणूक अधिकाऱ्यांनी सातपुते यांच्या संबंधित आक्षेपार्ह विधानाची चित्रफीत मागवून पडताळणी केली असता त्यात आचारसंहितेचा भंग झाल्याचा निष्कर्ष काढण्यात आला होता. त्यानुसार कुमार आशीर्वाद यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे अहवाल पाठविला होता. याशिवाय निवडणूक काळात पूर्वाश्रमीचे काँग्रेस आणि शिवसेनेचे माजी नगरसेवक देवेंद्र राजेश कोठे यांनीही भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या सोलापुरातील जाहीर सभेत बोलताना, सोलापुरात नई जिंदगी चौक व शास्त्रीनगर आदी मुस्लीमबहुल भागात ५० हजार बांगलादेशी घुसखोर राहात असल्याचा खळबळजनक आरोप केला होता.

# सीपीआर देत एसआरपीएफ जवानाने वाचवले सहकाऱ्याचे प्राण!

## कमलनयन बजाज रुग्णालयाच्या वतीने जवानांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** कमलनयन बजाज रुग्णालयातर्फे मागील काही दिवसापासून 'सेव्ह अ लाईफ' हा जनजागृतीपर कार्यक्रम राबवण्यात येत असून आपत्कालीन परिस्थितीमध्ये रुग्णालयात पोहोचण्यापूर्वी दिलेले प्रथमोपचार जीवन संजीवनी ठरू शकतात. हा या कार्यक्रमाचा पाया आहे. आजपर्यंत सोळा हजारापेक्षा अधिक विविध व्यक्तींना याविषयीचे प्रशिक्षण कमलनयन बजाज रुग्णालयातर्फे देण्यात आले आहे. यामध्ये शाळा, कॉलेज, आस्थापना व कंपन्यांचा समावेश आहे. हा निरंतर चालणारा कार्यक्रम असून लवकरच पन्नास हजाराहून अधिक व्यक्तीपर्यंत पोहोचण्याचा मानस आहे. नुकताच याचा प्रत्यक्ष अनुभव आला. एसआरपीएफ कॅम्पनमधील एका जवानाला आपत्कालीन वैद्यकीय परिस्थिती निर्माण झाली. त्यांचे सहकारी विजय परमार व विनोद हिवाळे यांनी प्रसंगावधान राखून सीपीआर सुरू केला व त्याला कमलनयन बजाज रुग्णालयाच्या अपघात



विभागात घेऊन आले. कमलनयन बजाज रुग्णालय मराठवाड्यातील सर्वात अद्यायावत व खऱ्याअर्थाने परिपूर्ण रुग्णालय असून एका छताखाली सर्व वैद्यकीय सुविधा उपलब्ध केल्या जातात. तसेच रुग्णालयात काम करणारा प्रत्येक व्यक्ती हा आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यास सक्षम असून सर्वांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. 'आय एम इमर्जन्सी रेडी' हे सर्वांचे ब्रीद वाक्य आत्मसात करून याठिकाणचे कर्मचारी सदैव सेवाभावाने रुग्णसेवा करत आहेत. याला अनुसरून जेव्हा या जवानाला अपघात विभागात आणण्यात आले तेव्हा संपूर्ण चमू तयारीत होता व तात्काळ उपचार सुरू करण्यात आले. वेळीच मिळालेल्या उपचाराने त्या जवानाचे प्राण वाचले. तात्कालिक प्रथमोपचार व विनाविलंब आरोग्य सेवा यामुळे त्या जवानाला जीवदान मिळाले. याबद्दल कमलनयन बजाज रुग्णालयाच्या वतीने आनंद व्यक्त करण्यात आला व यापुढेही अत्यवस्थ रुग्णांना त्वरित उपचार करण्याची बांधिलकी रुग्णालय प्रशासनाने बोलून दाखवली. एका कुटुंबातील प्रमुख सदस्याचे स्थान अनन्य साधारण महत्त्वाचे असते. त्याच्या जिवाचे बरे वाईट झाले तर संपूर्ण कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळतो म्हणूनच अशाप्रकारे सदोदित इतरांचे प्राण रक्षण करणे हे आपणा सर्वांचे कर्तव्य आहे. ज्या दोन जवानांचा प्रसंगावधानाने त्यांच्या सहकाऱ्याचे प्राण वाचले. त्यांचा कमलनयन बजाज रुग्णालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी एसआरपीएफचे जवान, सुप्रीम कमांडर विक्रम साळी आवर्जून उपस्थित होते.

यावेळी सुप्रीम कमांडर विक्रम साळी यांनी कमलनयन बजाज रुग्णालयातील स्वच्छता व डॉक्टर्सकडून दिल्या जाणाऱ्या सेवांवर समाधान व्यक्त केले. तर विजय परमार व विनोद हिवाळे या जवानांनी आपला अनुभव सांगताना डॉक्टर आणि संपूर्ण टीमचे कौतुक केले. रुग्णावर सर्वप्रथम उपचार आणि त्यानंतर पुढील कारवाई ही पद्धत अन्य रुग्णालयांनी देखील आत्मसात करण्याची अपेक्षा विनोद हिवाळे यांनी व्यक्त केली.

# स्थलांतरितांचा प्रश्न

आधुनिक केसरी

ब्रिटनने स्थलांतरितांचे प्रमाण कमी करण्याकरता महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. युकेमध्ये विद्यार्थी अवलंबित अर्जांमध्ये ८० टक्के घट झाली आहे, अशी माहिती ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांनी दिली. त्यांनी यासंदर्भातीलू मायक्रोब्लॉगिंग साईट एक्सवरून दिली. ब्रिटनच्या गृह मंत्रालयाने या आठवड्यात एक नवीन डेटा जाहीर केला. ब्रिटनमध्ये स्थानिकांच्या बेरोजगारीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. नोकरीनिमित्त जगभरातील अनेक कर्मचारी ब्रिटनमध्ये स्थायिक आहेत. तसंच, विद्यार्थी व्हिसावर अवलंबून अनेकजण येथे स्थायिक होतात. तेही नोकरी करतात. त्यामुळे येथे बेरोजगारीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. परिणामी ब्रिटनने मोठा निर्णय घेतला. त्यानुसार, ब्रिटनने विद्यार्थ्यांवर अवलंबून असलेल्या अर्जांमध्ये काही निर्बंध कडक केले. परिणामी अर्जांमध्ये घट झाली आहे. ब्रिटनच्या ७५ हून अधिक विद्यापीठांमध्ये केलेल्या सर्वेक्षणावर आधारित इव्हनिंग स्टँडर्डच्या अहवालानुसार सप्टेंबर २०२४ साठी ८८ टक्के पदव्युत्तर अर्जांमध्ये घट झाली आहे, जी मागील वर्षाच्या एकूण अर्जांपैकी २७ टक्के कमी आहे. जानेवारी २०२४ पासून नवे नियम लागू करण्यात आले आहेत. नोकरी किंवा शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबर त्यांच्या कुटुंबातील लोकांच्या व्हिसावर निर्बंध लागू करण्यात आले आहेत. तसंच, व्हिसावर राहणाऱ्या लोकांना उच्च पगाराचीही मर्यादा घालण्यात आल्याने हे अर्ज कमी झाले आहेत. डिसेंबर २०२२ पर्यंत युकेमध्ये ७ लाख ४५ हजार स्थलांतरित होते. तर, जून २०२३ पर्यंत युकेमध्ये जवळपास ६ लाख ७२ हजार स्थलांतरित होते. दर्मयान, २०२४ मध्ये ही संख्या कमी होत राहण्याची सरकारची अपेक्षा आहे. लंडनमधील एवाय ॲण्ड जे सॉलिसिटरचे संचालक आणि वरिष्ठ इमिग्रेशन असोसिएट यश दुबल म्हणाले, व्हिसाधारकांवर अवलंबून असलेल्यांना ५० टक्के लोकांना व्हिसा मिळत नाही हे खरं आहे. कमी ते मध्यम-कुशल कामगारांना कमी व्हिसा मिळतो. जानेवारी २०२३ पासून ब्रिटिश गृह कार्यालयाने कुशल कामगार, आरोग्य कामगार आणि आंतरराष्ट्री विद्यार्थ्यांसाठी १ लाख ३९ हजार १०० व्हिसा प्रदान करण्यात आले आहे. मागील बारा महिन्यांत ही संख्या १ लाख ८४ हजार होती.

# ४ जूनला सूर्यकिरणातून कमळ फुलणार



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**महाराष्ट्राचं लक्ष्य लागलेल्या बीड लोकसभा मतदारसंघात १३ मे ला निवडणुक प्रक्रिया पार पडली. १५ लाख मतदारांनी आपला हक्क बजावला. निवडुन कोण येणार ? कुणाला किती मते पडणार?, नेमकं कुणाचं काय होणार? तर्कवितर्क दिवस रात्री आकडेमोड काढत सुरू झालं यात शंका नाही. सोशल मिडियाचा जमाना असल्याने अनेकांच्या प्रतिक्रिया नव्हेतर आकड्यासहित अंदाज पे अंदाज पडताना दिसु लागले. निवडणुक अटीतटीची झाली नक्कीच. दुरंगी लढतीत वंचित उमेदवार देखील आणि इतर लढवताना दिसुन आले. सामना मात्र महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये झाला. जातीपातीचा रंग लागला का? तर नाही असं सुद्धा म्हणता येणार नाही.**

कुठल्या मतदारसंघात कुणी काय केलं? किंवा कुणी बघ्याची भुमिका घेतली? हा हिशोब खऱ्या अर्थाने दोन्हीही उमेदवारांच्या डोक्यात निश्चित असु शकतो. ०४ जुनला निकाल आहे. आम्ही देखील भविष्यकार निश्चित नाहीत. पण अनेक वर्षापासुन राजकिय विश्लेषण करताना निवडणुकीत लावलेले अंदाज चुकीचे ठरलेले नाहीत. स्पष्ट सांगायचं झालं तर ०४ जुनचा सुर्य पंकजाच्या कमळ फुलाने सुर्य किरणासह बाहेर पडणार आणि बंद मतपेटीतलं भवितव्य सत्यात उतरल्यानंतर पंकजाताई मुंडे विरूद्ध बजरंग सोनवणे त्यात पंकजाताईचा विजय निश्चित होईल. यात कुठलीही शंका नाही. कदाचित विरोधकांनी सुद्धा कमळ फुलाचा विजय मान्य केला असावा.

या मतदारसंघात जेवढं मतदान झालं कदाचित राज्यात सर्वाधिक मतदान ज्याची आकडेवारी एक दिवस उशिरा प्रशासनाकडून आली. ६९ टक्केच्या आसपास आतापर्यंत एवढं मतदान कधी झालं नव्हतं. निवडणुक प्रक्रिया शांततेच्या वातावरणात पार पडली. एखादा अपवाद सोडला तर अनुचित प्रकार कुठे काहीच घडला नाही. जिल्हा प्रशासनाचं खरं तर कौतुक करायला हवं. पोलीस अधिक्षक यांनी देखील चोख भुमिका बजावली ज्यामुळे कुठेही शांततेचा भंग झाला नाही. निवडणुकीच्या निमित्ताने जिल्ह्यात सामाजिकीकरण बिघडुन गेले कारण महाविकास आघाडीने सुरूवातीपासुनच या निवडणुकीला त्यांच्या नेत्यांनी देखील जात पात धर्माचा रंग दिला तर दुसऱ्या बाजुने महायुतीनं ही निवडणुक विकासाच्या प्रश्नावर लढवली. वास्तविक पहाता २००९, २०१४, २०१९ या लोकसभेच्या निवडणुका देखील जातीपातीचा विषारी प्रचाराने रंगुन गेल्या होत्या. विजय मात्र मुंडे कुटुंबियांचा झाला. १५ लाख थोडेफार जास्त असं मतदान एकुण या लोकसभा मतदारसंघात झालेले आहे. जातनिहाय मतदारसंघाची आकडेवारी सांगता आली नाही तरी सर्वाधिक मतदान मराठा समाजाचं पाठोपाठ वंजारी समाज, मुस्लिम आणि दलित, धनगर, वंजारा आणि इतर एकुण २१ लाखापेक्षा थोडे जास्त मतदान मतदारसंघात आहे. निवडणुक प्रचार अनेक रंगाढंगाने गाजला. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी तर दुसऱ्या बाजुला शरद पवारांच्या जाहिर सभा जिल्ह्यात झाल्या. राजकिय वातावरण ढवळून निघाले आणि सामाजिक वातावरण तितकेच बिघडुन देखील गेले असं म्हणायला हरकत नाही. खरं तर राजकारण हे केवळ निवडणुकीपुरतं असतं. नंतर समाजकारण



करावं लागतं. असे आदर्श राजकारणाच्या दिग्गज नेत्यांनी घालुन दिलेले आहेतच. सामाजिक ऐक्य, सलोखा, आपआपसातील संबंध, स्नेहभाव आणि आपण सारे एकच या भावनेतुन खऱ्या अर्थाने जिल्ह्यातील लोकांनी वागणं तितकंच महत्वाचं वाटतं. झालेल्या गोष्टी गंगेला मिसळुन जावु द्या.

आता नव्याने कुठल्याही राजकिय कुरापती न काढता आपण सारे एकच हा विचार प्रत्येकाने मनात धरून चालायला हवं. गावागावात असो किंवा शहरात असो शेवटी राजकारणामुळे वैयक्तिक द्वेष किंवा भेदभाव निर्माण होणे चांगले नाही. मग तुम्ही म्हणाल, निवडणुकीचा निकाल नेमका आहे तरी काय? तसं पाहता बंद पेटीतलं भवितव्य स्पष्ट कुणी सांगेल? कारण ब्रह्मादेवाशिवाय न कळे कुणा? शेवटी राजकिय अंदाज परिस्थितीनुसार काढले जातात. आज वंचित उमेदवार अशोक हिंगे किंवा त्यांचे कार्यकर्ते म्हणु शकतात की विजय आमचाच आहे. बजरंग सोनवणे स्वतः दावा करत असतील की विजय आमचाच आहे आणि महायुतीच्या उमेदवार पंकजाताईंना देखील आम्ही विजयी होवु आत्मविश्वास असु शकतो. यावर आम्ही मिळवलेल्या माहितीनुसार किंवा या मतदारसंघात प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील घेतलेल्या कानोश्यानुसार निकालाअंती विजय हा पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांचा निश्चित असु शकतो. त्यासाठी काही राजकिय अंदाज आम्ही बांधले. बीड विधानसभा मतदारसंघात किमान ३५ हजार मताधिक्य सोनवणे यांना पडु शकते. गेवराई विधानसभा मतदारसंघात सोनवणे यांना १८ हजार पड्डु शकते. माजलगाव शहर आणि तालुका सोनवणे यांना चांगला असला तरी धारूर आणि वडवणी दोन्हीही तालुक्यातुन पंकजाताईला मिळालेले मताची आघाडी माजलगाव तालुक्याला क्रैश करू शकते. अर्थात मिळेल तर पाच-सहा हजार पंकजाताईलाच नाही मिळाली तर किमान समान मते या मतदारसंघात पडु शकतात. राहिला प्रश्न केज मतदारसंघाचा इथे अंबाजोगाई शहरात बजरंग सोनवणे यांना बारा ते पंधरा हजाराचं मताधिक्य असु शकतं पण अंबाजोगाई ग्रामीण त्यावर मात करण्याची शक्यता कदाचित झिरो मायनस करून सोडेल. परिणामी केज भागातुन मताधिक्य येणारं पहाता बारा ते पंधरा हजाराची लीड पंकजाताईला मिळु शकते. आष्टी, पाटोदा, शिरूर कुणी काहीही म्हणत असलं तरी छत्तीस हजाराच्या आसपास पंकजाताईला मताधिक्य मिळणारच आणि ज्या विधानसभा मतदारसंघात विजयाचा पेटारा खुलला जाणार. त्या परळी विधानसभा मतदारसंघातुन ६५ हजारपेक्षा जास्त मताधिक्य पंकजाताईला मिळेल. याचा अर्थ आष्टी, केज आणि परळी या तीन विधानसभा मतदारसंघात पंकजाताईसाठी १ लाख १६ हजार मताधिक्य मिळु शकते तर बजरंग सोनवणे यांना बीडात ३५ हजार, गेवराई १८ हजार मताची आघाडी मिळु शकते म्हणजेच ५३ हजार मतं सोनवणे यांना बीड, गेवराईत मिळतील. माजलगाव मतदारसंघ दोघांना सारखाच पकडल्यामुळे त्याचे मताधिक्य आम्ही इथे धरत नाहीत. पंकजाताईला १ लाख १६ हजार मिळणारी मते त्यात ५३ हजार सोनवणेंची मायनस केली तर ६३ हजार मताधिक्याने त्यांचा विजय काळ्या दगडावरची पांढरी रेघ म्हणावी लागेल. माजलगाव समान म्हटलं तरीही प्राप्त माहितीनुसार ५ हजार मतं पंकजाताईच्या पारड्यात पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. परिणामी ६८ ते ७५ हजारात पंकजाताईचा विजय १०० टक्के होईल अशा प्रकारचा अंदाज निवडणुक प्रक्रिया पार पडल्यानंतर दोन दिवसातल्या मिळालेल्या माहितीनुसार काढण्याचा प्रयत्न आम्ही निश्चित केला. त्यामुळे ०४ जुनच्या सुर्याची किरणं पंकजाताईच्या पाकळ्यांनी फुलल्याशिवाय रहाणार नाही हे अगदी ठाम विश्वासाने सांगायला आम्ही मागे रहात नाहीत. यापेक्षा स्पष्ट सांगायचं झालं तर मताधिक्य नेमके किती हे सांगण्यासाठी आम्ही ब्रह्मदेव नाहीत पण विजय मात्र पंकजाताई मुंडेंचा होणारच यात शंका वाटत नाही.

# अनंत आघाताने ज्यांचं सज्जनत्व भंगत नाही त्या महान विभूती म्हणजे संत



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**स्वतःला संत समजणं आणि वास्तविक संत असण या मध्ये जमिन असमानच अंतर असत खरे संत लोकांना कळत नाहीत हे दुर्भाग्य आहे.संत आणि अघात हे एका नाण्याच्या दोन बाजू असतात. पण कितीही अनंत अघात होऊन देखील ज्यांचं सज्जनत्व भंगत नाही त्या महान विभूती म्हणजे संत असतात.सत्यनिष्ठ, धर्मनिष्ठ, कर्मनिष्ठ, सज्जनत्व जपताना अनंत अघात सहन करून तावुन सुलाखून निघालेले व्यक्तिमत्त्व म्हणजे संत.चोवीस कॅरेट सोनं हे किती हि अग्री परिक्षेला समोर गेलं तरी त्याला फरक पडत नाही. अथवा त्याची सत्यता वास्तविकता कमी होत नाही त्याच प्रमाणे कितीही अघात झाले तरी आपलं सज्जनत्व जे सोडत नाहीत ते संत.**

आपण कोणाला संत समजावं अथवा समजलं पाहिजे हा ज्याच्या त्याच्या व्यक्तिगत श्रद्धेचा भाग असुन आपण आपली श्रद्धा जपली पाहिजे अथवा नाही हा देखिल व्यक्ति स्वतंत्र्याचा भाग आहे. विवेकशील नागरीक म्हणून वास्तवाची जाणीव असणं देखिल गरजेचे आहे. वास्तवाकड पाहिलं तर या सृष्टी वर मानवी जीवन व्यतीत करताना काळाचे वेळेचे नियतिचे निसर्गाचे, अनेक घाव पडत असतात ते घाव पडण नैसर्गिक आहे. ते कोणालाही चुकलेले नाहीत पण हेच घाव पडल्यावर ज्यांची स्थिती बदलते अथवा मार्ग बदलतो त्यांचं मुल्यमापन वेगळं होतं.अणि अनेक अघात होऊन देखील जे आपला सत्य मार्ग सोडत नाहीत त्यांचं मुल्यमापन हे वेगळ ठरत. समाजात वावरताना अथवा लोककल्याण करताना देखील समाजातील अनेक विघातक शक्ति हा मार्ग रोखण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करत असतात त्या मधुन अनेक मनस्ताप दायक बाबींना देखील समोर जावं लागतं. त्यातील अनेक वेगवेगळे प्रकार हे टोकाचे देखिल असतात असु शकतात पण तरीही सामाजिक पातळीवर असणार लौकिक जगाताला दोषी न ठरवता त्यांच्या संदर्भात कोणत्याही प्रकारच मत न नोंदवता आपली शांती संयम टिकवुन ठेवुन टोकाचे अघात देखिल सहजपणे पचवतात. या आघाताने खचुन न जाता आपलं कार्य लोककल्याण हिच समर्पित भावना डोळ्यासमोर ठेवून सत्यनिष्ठा, आचरण कायम चालू ठेवतात आणि याच दरम्यान सज्जनत्वाची वेळोवेळी अग्नी परिक्षा देवून स्वतःच दिव्यत्व कायम ठेवत आपला सज्जनपणा टिकून ठेवतात असं महान भव्य दिव्य विचारांचं भांडार,ज्ञानाचा महासागर असणार व्यक्तिमत्त्व म्हणजे संत मग ते कोणत्या जाती मध्ये धर्मा मध्ये जन्माला आले हे गौण आहे. जन्म कुठे झालं हे फार महत्त्वाच नाही.कार्य आणि आचरण ह्याच प्रमुख बाबी महत्त्वाच्या आहेत. सत्यनिष्ठ आचरण हि मानवी जीवनातील सत्वपरीक्षा आहे. असत्य मार्गावर काहिच अडचण नाही सुसाट वेगाने धावता येत पण नितीचा सत्याचा मार्ग खुप कठिण आहे पावलोपावली क्षणोक्षणी सत्व सत्वपरीक्षा घेणारे उभा असतात. वेळेला सुद्धा खेद वाटेल एवढ्या सत्वपरीक्षा सज्जनांच्या वाट्याला येतात.पण थकतील ते सज्जन कसले. कळी काळावर मात करण्याची क्षमता असणारे सज्जन हे न थकता न रूकता क्षणोक्षणी वेळोवेळी सज्जनत्वाची सत्वपरीक्षा देत उत्तीर्ण होत असतात. हि दिव्य अग्नी परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी अफाट संयम समुद्रासारखी शांतता, सत्यनिष्ठ आचरण तर आवश्यक आहेच पण सत्याची अभिव्यक्ती व्हावं लागतं मोह, माया स्वार्थ या पलिकडे असणार व्यक्तिमत्त्व आपोआप संत पदाला पोहचवतच वेळ काळ परिस्थिती नुसार लोकांना खरे संत कळत नाहीत हे अगदी वास्तव आहे.अनेक वर्षांची परंपरा तपासली तर असं लक्षात येतं की वेळोवेळी लोक कल्याणार्थ आपलं जीवन समर्पित असणारे महात्मे महापुरुष यांना त्या त्या काळात अनेक अघाताना समोर जावं लागल पण अनेक अघात त्यांनी सहजपणे पचवले पण या मध्ये आपला सज्जनपणा टिकवून ठेवला हे वास्तव आहे म्हणून आज या स्थितीत त्यांना लोक मनात देवत्व प्राप्त झालं आहे. वेळ काळ परिस्थिती कोणतीही असो संत आणि सज्जनत्व ह्या एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. जिथ सत्य आहे, सज्जनत्व आहे तिथे संत तत्व आहे हि बाब आज समजण काळाची गरज आहे. धार्मिक श्रद्धा हा व्यक्तिगत विषय जरी असला तरी स्व कल्याण होण्यासाठी आपला विवेक जागृत ठेवून आपण खरया संत तत्वांची पारख करून घेतली पाहिजे. सृष्टीवर जन्म मिळाल्यावर खरया अर्थाने संत होता आलं पाहिजे हिच खरी आयुष्यातील सर्वात सुंदर मोठी भव्य दिव्य उपलब्धी आहे. पण त्यासाठी आपली सत्यनिष्ठ हि पराकोटीची असली पाहिजे आणि सज्जनपणा हा तर लाखो करोडो अघाता नंतर सुध्दा आपली निष्ठा बदली नाही पाहिजे एवढा ठासून भरलेला असला पाहिजे त्याच बरोबर नैतिकता जपताना संकटाचा सामना संघर्ष करावा लागण क्रमप्राप्त असलं तरी सुद्धा आपला संघर्ष हा यशस्वी झाला पाहिजे आपलं सज्जनत्व आपल्याला टिकवता आल पाहिजे आणि कलियुगाचा किती ही प्रभाव असला तरी देखील आपल्याला सुद्धा खरया संतांच्या संगतीत राहता आलं पाहिजे अथवा आपल्याला सुद्धा हे गुण अवगत करून या दिशेने मार्गक्रमण करण्याची मानसिकता निर्माण झाली पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# जिल्हा स्टेडियम येथे भेट देत आ. जोरगेवार केली पाहणी

## नागरिकांच्या तक्रारीवरुन सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या केल्या सूचना

आधुनिक केसरी न्यूज

**चंदपूर :** जिल्हा स्टेडियम हे चंद्रपूरातील प्रमूख ठिकाण आहे. भावी पोलीस येथे सराव करतात, अनेक खेळाडू येथून घडले आहे. जेष्ठ नागरिकांच्या व्यायामाचे हे प्रमूख ठिकाण आहे. त्यामुळे येथील विकासकामात हलगर्जीपणा करु नका, उत्तम दर्जाचे काम करत सर्व सोयी सुविधा उपलब्ध करा अशा सुचना आमदार किशोर जोरगेवार यांनी जिल्हा क्रिडा अधिकारी अविनाश पुंड यांना केल्या आहे.

जिल्हा स्टेडियम येथे सुरु असलेल्या विकास कामांबाबत नागरिकांच्या तक्रारी आमदार किशोर जोरगेवार यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्या होत्या. दरम्यान तक्रारींची दखल घेत आमदार किशोर जोरगेवार यांनी आज गुरुवारी सकाळी जिल्हा स्टेडियम येथे जात येथील कामाची पाहणी करत नागरिकांशी संवाद साधला. यावेळी जिल्हा क्रिडा अधिकारी अविनाश पुंड यांची उपस्थिती होती. चंद्रपूरातील जिल्हा स्टेडियम येथे विविध प्रकारच्या खेळांसाठी सोयी उपलब्ध करण्यात आल्या आहे. येथे खेडाळू सराव करण्यासाठी मोठ्या संख्येने येत असतात. येथील विविध विकासकामांसाठी मोठा निधी प्रशासनाच्या वतीने देण्यात आला आहे. यातून येथे स्विमिंग पुल सह विविध कामे केल्या जात आहे. तर अनेक कामे पुर्णत्वास आली आहे. तर काही कामे प्रगतीपथावर आहे. दरम्यान या कामाचा दर्जा खालवत चालला असल्याच्या तक्रारी नागरिकांनी आमदार किशोर जोरगेवार यांच्या कार्यालयात केल्या होत्या.

दरम्यान आज आमदार किशोर जोरगेवार यांनी सदर कामाची पाहणी करत येथे येणा-या नागरिकांशी संवाद साधला. यावेळी येथील स्विमिंग टॅंगचे काम उत्तम दर्जाचे नसल्याचे नागरिकांनी सांगितले याचीही यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी पाहणी केली. येथील शौचालय स्वच्छ ठेवण्यात यावे, येथील क्रिडा साहित्य खेडाळूंसाठी उपलब्ध करण्यात यावीत अशा सुचना यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी जिल्हा क्रिडा अधिकारी अविनाश पुंड यांना केल्या आहे. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी येथील खेळाडूंचीही भेट घेत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आहे.



# परवानाधारक कृषी केंद्रातून बियाण्यांची खरेदी करा; अनधिकृत बियाण्यांबाबत तक्रार करा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** बीटी कापसाच्या विविध कंपनीच्या संशोधित वाणांचे गुणधर्म व उत्पादकतेमध्ये विशेष फरक नसतो तर येणारे उत्पन्न हे पिकांचे व्यवस्थापन तसेच जमिनीच्या मगदूरावर/ सुपीकतेवर अवलंबून असते. तुलनात्मक गुणधर्म व क्षमता असलेल्या बियाण्यांची परवानाधारक कृषी केंद्रामध्ये उपलब्धता असून एमआरपी दरामध्ये गुणात्मक बियाण्याची खरेदी करून शेतक-यांनी लागवडीच्या खर्चात बचत करावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

**अशी करा कपाशी बियाण्याची निवड :** कपाशीचे वाण निवडताना कोरडवाहू किंवा बागायती लागवडीचा प्रकार व गुणधर्म याचा विचार करावा. सर्व प्रकारच्या हवामानास व जमिनीस अनुकूल वाण असावे. आपल्या भागात उत्पादनात सरस असणारा वाण निवडावा. रस शोषण करणाऱ्या किडी व रोगांना सहनशील प्रतिकारक्षम वाण असावा. शेवटपर्यंत पाने हिरवी राहिल्यास अन्न तयार करण्याचे काम अखेरपर्यंत चालते. त्यामुळे उशिरा लागणाऱ्या बोंडाचा सुध्दा आकार मोठा राहतो व बोंडे फुटण्याचे प्रमाण वाढते. बागायती लागवडीसाठी मध्यम ते उशिरा येणारे तर कोरडवाहू लागवडीसाठी लवकर तयार होणारे वाण निवडावे. बोंडाचे आकार बागायती लागवडीसाठी मोठा व कोरडवाहू लागवडीसाठी मध्यम असावा. पाण्याचा ताण सहन करणारा वाण निवडावा. या गुणधर्माप्रमाणे मागील हंगामातील अनुभव तसेच आपण स्वतः इतर शेतकऱ्यांच्या कपाशीच्या वाणाची निवड करावी. अधिक उत्पादन देणारे वाण बाजारात उपलब्ध असून त्यांचे त्या त्या वाणाच्या गुणधर्मानुसार योग्य नियोजन व व्यवस्थापन केल्यास निश्चितपणे चांगले उत्पादन मिळेल. त्यामुळे शेतकऱ्यांच्या फायदा होईल. सध्या बाजारात विविध कंपन्यांचे बीटी कापूस बियाणे उपलब्ध आहे. यासर्व वाणांमध्ये विशेष फरक नसून एखाद्या विशिष्ट वाणांची मागणी करू नये किंवा जादा दराने खरेदी करू नये. तसेच खरेदी परवानाधारक कृषी केंद्रातूनच करावी. बाहेर राज्यातून किंवा दलाला मार्फत बियाणे खरेदी टाळावे. याबाबत काही तक्रार असल्यास अथवा अनधिकृतरित्या कोणीही विक्री करत असल्यास टोल फ्री क्रमांक 7498655232 या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी तोटावार व कृषी विकास अधिकारी विरेंद्र राजपूत यांनी केले आहे.

# मतमोजणी प्रक्रियेत अतिशय गांभीर्याने काम करा : जिल्हाधिकारी विनय गौडा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** निवडणूक प्रक्रियेमध्ये मतमोजणी हा अतिशय संवेदनशील आणि महत्वाचा टप्पा आहे. किंचीतही चूक झाली तर संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह लागू शकते. त्यामुळे मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचा-यांनी अतिशय गांभिर्याने काम करण्याची आवश्यकता आहे, अशा सुचना जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिल्या.

नियोजन सभागृह येथे गुरुवारी मतमोजणी प्रक्रियेतील अधिकारी – कर्मचा- यांचा आढावा घेतांना ते बोलत होते. मंचावर सहायक जिल्हाधिकारी सुहास गाडे, अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी, उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, उपविभागीय अधिकारी रविंद्र माने, शिवनंदा लंगडापुरे, नितीन हिंगोले आदी उपस्थित होते.

19 एप्रिल 2024 रोजी 13 – चंद्रपूर लोकसभा मतदारसंघासाठी निवडणूक घेण्यात आली असून मतदानाच्या ईव्हीएम स्ट्रॉंगरुममध्ये ठेवण्यात आल्या आहेत, असे सांगून जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, 4 जून रोजी तडाळी येथील वखार महामंडळाच्या गोडावून येथे मतमोजणी होणार आहे. हा अतिशय महत्वाचा टप्पा आहे. मतमोजणी प्रक्रियेमध्ये कोणतीही चूक किंवा हलगर्जीपणा होता कामा नये. निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले निरीक्षक, उमेदवार, उमेदवारांचे प्रतिनिधी व इतर सर्वजणांचे अतिशय बारकाईने या प्रक्रियेवर लक्ष असते. तसेच उमेदवारांच्या निवडणूक प्रतिनिधींना विश्वासात घेऊन मतमोजणीची प्रक्रिया समजावून सांगणे / दाखविणे आवश्यक आहे.

पुढे जिल्हाधिकारी गौडा म्हणाले, भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणेच आणि मॅन्युअलचा अभ्यास करून अतिशय पारदर्शक आणि अचूकपणे मतमोजणी करावयाची आहे. मतमोजणी प्रक्रियेदरम्यान संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्याने गोपनीयता पाळणे आवश्यक असून कोणीही स्वतःचे मत व्यक्त करू नये तसेच प्रक्रियेची माहिती इतरांना देऊ नये. संपूर्ण प्रक्रियेदरम्यान अधिकारी – कर्मचाऱ्यांनी तटस्थ असणे गरजेचे आहे. मतमोजणी केंद्रामध्ये अधिकारी – कर्मचारी व इतरांना मोबाईल, लॅपटॉप किंवा इलेक्ट्रॉनिक वस्तु नेण्यास परवानगी नाही. संपूर्ण प्रक्रियेसाठी तीनवेळा रॅंडमायझेशन होणार असून ईव्हीएम व्हीव्हीपॅट मतमोजणी बाबत सर्वांनीच तयारी करून ठेवावी, अशा सूचना जिल्हाधिका-यांनी दिल्या.

यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी यांनी सादरीकरण केले. तसेच ईव्हीएम मतमोजणीकरीता प्रत्येक विधानसभा मतदारसंघनिहाय 14 टेबल, पोस्टल बॅलेटकरीता 9 टेबल आणि ईटीपीबीएस मतमोजणी करीता 8 टेबल राहणार आहे. 4 जून 2024 रोजी सकाळी 8 वाजता पोस्टल बॅलेटच्या मतमोजणीला सुरवात होणार असून त्यानंतर ईव्हीएम मतमोजणी होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# कोकणासह विदर्भात अवकाळी पाऊस

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यात कुठे ऊन, तर कुठे पाऊस अशी परिस्थिती पाहायला मिळत आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे. कोकणात काही भागात उष्णतेची लाट तर काही भागात जोरदार पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे. राज्यात काही जिल्ह्यात अवकाळी पावसाचा जोर दिसून येत आहे. जोरदार वारे आणि विजेच्या गडगडाटासह लातूरमध्ये पावसाची तुफान बॅटिंग सुरु आहे. बुलढाणा जिल्ह्यातही अनेक भागात अवकाळी पावसाच्या सरी दिसत आहेत. खामगाव, शेगाव परिसरात वादळी वाऱ्यासह पाऊस सुरु आहे.

रत्नागिरी, चिपळूणमध्ये जोरदार वाऱ्यासह पावसाला सुरुवात विजांच्या कडकडाटासह चिपळूण आणि परिसरात जोरदार पाऊस सुरु झाला आहे. रत्नागिरी, चिपळूणमध्ये जोरदार वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली आहे. अचानक आलेल्या पावसाने नागरिकांची तारांबळ उडाली. पावसाच्या आगमनाने उष्णतेने त्रस्त नागरिक सुखावला आहे, पण आंबा बागायतदार मात्र चिंतेत आहेत. रायगडच्या माणगाव परिसरात वादळी वाऱ्यासह पाऊस सूरु झाला आहे. रायगडच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड परिसरात पाऊस सुरू आहे. रायगड जिल्ह्यात जोरदार वादळी वाऱ्यासह जोरदार अवकाळी पाऊस सुरु झाला आहे. विजांच्या कडकडाटासह जिल्ह्यातील बहुतांश भागात जोरदार अवकाळी पाऊस पाहायला मिळत आहे. अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांची आणि नागरिकांची तारांबळ उडाली आहे. अवकाळी पावसामुळे मात्र आंबा बागायतदार आणि जांभूळ पीक घेणारे शेतकरी चिंतेत आहेत. रायगडमध्ये वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाला आहे. रायगडच्या महाड, माणगाव, पोलादपूर , म्हसळा श्रीवर्धन भागात अवकाळी पाऊस सुरु आहे. लोनेर परिसरात गारांचा पाऊस कोसळला आहे. रायगडच्या दक्षिण भाग असलेल्या माणगाव महाड पोलादपूर म्हसळा श्रीवर्धन हरिहरेश्वर परिसरात आज अचानक वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली आहे. दुपारी 3 वाजेपर्यंत कडक उन्हाचे चटके बसत असताना अचानक रायगडच्या या भागात वादळी वाऱ्यासह ढगाळ वातावरण निर्माण झाले आणि अचानक अवकाळी पाऊस कोसळू लागला. रायगड जवळील पाचाड येथे असलेल्या भागात सद्यःस्थितीत जोरदार पाऊस कोसळत असून लोनरे म्हसळा परिसरातील भागात आणखी जोरदार पाऊस लागण्याची शक्यता हवामान खात्याकडून वर्तविण्यात आली आहे.

**लातूरमध्ये पावसाची तुफान बॅटिंग :** लातूर शहर आणि परिसरात आज दुपारी तीन वाजता पावसाने जोरदार हजेरी लावली होती . तुफान वारे आणि विजेच्या गडगडला सुरुवात झाली होती . काहीवेळाने पावसाने हजेरी लावत वातावरणाचा नूर पालटला . अर्धातास पेक्षा अधिक काळ पावसाने तुफान बॅटिंग केली . रस्त्यावर सगळीकडे पाणीच पाणी झाले होते . आज सकाळपासूनच वातावरणात उकाडा जाणवत होता . या पावसामुळे वातावरणात प्रचंड गारवा निर्माण झाला आहे . जिल्ह्यातील अनेक भागात ढगाळ वातावरण आहे त्यात लामजना किल्लारी औसा आणि निलंगा तालुक्यातील अनेक भागात पावसाच्या मध्यम ते हलक्या सरी पडून गेल्या आहेत . त्याच वेळी लातूर शहर आणि परिसरात मात्र पावसाने तुफान बॅटिंग केली आहे .

**अवकाळी पावसामुळे भातपिकाची नासाडी :** मागील आठवड्यात आलेल्या अवकाळी पावसामुळे भंडारा जिल्ह्यातील भात पिकांचं मोठं नुकसान झालं . कापणीला आलेला भातपीक वादळी वारा आणि पावसामुळे जमीनदोस्त झालं तर काही भागात मळणीसाठी कापून ठेवलेला भातपीकाच्या कडपा पाण्याखाली आल्यानं भातपिकांची मोठ्या प्रमाणात नासाडी झाली तर काही ठिकाणी पावसात भिजल्यानं भातपिकांना दुर्गंधी सुटली आहे . अवकाळी पावसाचा शेतकऱ्यांना चांगलाच फटका बसला आहे . पावसानं आता उसंत घेतली असून शेतकऱ्यांनी आता धान मळणी केली आहे . मात्र, तिला मार्केटमध्ये दर मिळेल की नाही, ही भीती व्यक्त होत आहे . किमान हातात आलेल्या भात पिकाला योग्य दर मिळावा, यासाठी पावसात भिजलेल्या धानाला सुकविण्याची शेतकऱ्यांची धडपड सुरू आहे .



# आदिवासी विद्यार्थ्यांच्या गुणांना वाव; 142 प्रशिक्षणार्थी सहभागी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय, चंद्रपूर अंतर्गत 23 एप्रिल ते 22 मे 2024 या कालावधीत उन्हाळी शिबीर हा उपक्रम राबविला जात आहे. प्रकल्पात पहिल्यादांच अशा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून विविध प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांचे कलागुण विकसीत होण्यास मदत होईल, असा विश्वास प्रकल्प अधिकारी विकास राचलेवार यांनी व्यक्त केला. शासकीय माध्यमिक तथा उच्च माध्यमिक कन्या आश्रमशाळा बोर्डा (ता. चंद्रपूर) येथे करण्यात आले आहे. उन्हाळी शिबिरात शासकीय/ अनुदानित आश्रम शाळेतील एकूण 142 विद्यार्थी (62 मुले व 80 मुली) सहभागी झाले आहेत. शिबिरात विद्यार्थ्यांच्या निवासाची, भोजनाची व प्रशिक्षणाची मोफत सोय करण्यात आली आहे. प्रशिक्षित मार्गदर्शक / प्रशिक्षक यांच्या मार्फत विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जात आहे.

1. योगा प्रशिक्षण माधुरी वानकर यांच्यामार्फत दिले जात असून यात योगा विषयीची माहिती, योगाचे फायदे, ओंकार साधना, पूरक हालचाली, योगासन आदींचा समावेश आहे. 2.आर्चरी प्रशिक्षण गिरीश कुकडे व अक्षय टेकाडे यांच्यामार्फत देण्यात येत आहे. यात धनुर्विद्या या खेळामध्ये धनुष्याबाण चालवून आपले लक्ष कसे भेदायचे याचा सराव देण्यात येत आहे. 3.गोंडी पेटींग प्रशिक्षण सुभाष लांजेवार व पी.टी.गवाळ यांच्यामार्फत देण्यात येत आहे. यात वारली पेन्टिंग मध्ये त्रिकोण,चौकोण, वर्तुळ आणि रेषाच्या माध्यमातून पेन्टिंग, त्यामध्ये विटांची लाल भुकटी, तांदळाची पीट, शेण, कोळसा यांचा वापर करण्याच्या उद्देशाने गोंडी आणि वारली पेन्टिंगचे प्रशिक्षण दिले जात आहे. 4.तायक्वांडो प्रशिक्षण तुषार दुर्गे व अनुष्का काळे यांच्यामार्फत देण्यात येत आहे. यात किक्स, पचेस, ब्लॉकिंग, स्वःरक्षण याचा समावेश आहे. 5.व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षण चंद्रशेखर कंदालवार देत आहेत. यात उद्दिष्ट, वेळेचे बंधन, बायोडाटा लिखाण, संवाद कौशल्य या मुद्यावर विद्यार्थ्यांना परीपक्व करण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच काय करावे, काय करु नये, कधी, कुठे, काय बालायचे, कसे वागायचे आपले सामर्थ्य, आपल्यातील कमजोरी, आपल्याला मिळालेली संधी, होणारे संभाव्य धोके यावर नियत्रंण व मंच वापर कसा करायचा याचे प्रशिक्षण या माध्यमातून दिले जात आहे. 6.इंग्लीश स्पीकिंग कोर्स अनिल दहागावकर यांच्यामार्फत देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या मनात इंग्रजी विषयाची भीती आणि न्यूनगंड असल्यामुळे ते दूर करण्यासाठी विविध मानसशास्त्रीय प्रशिक्षण तंत्राचा अवलंब करून सरावावर भर देण्यात येत आहे. या माध्यामातून विद्यार्थ्यांना इंग्रजी संदर्भात आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. 7.संगीत कला प्रशिक्षण विशाल बावणे व राहून पडघने देत आहेत. विद्यार्थ्यांमध्ये संगीत विषयाची आवड निर्माण व्हावी तसेच त्यांना स्वयंरोजगाराची संधी मिळावी या उद्देशाने त्यांना होर्मोनियम, तबला, ढोल इत्यादी वाद्ये वाजविण्याचे तसेच गायनाचे प्रशिक्षण दिले जात आहे. उन्हाळी शिबिराला प्रकल्प कार्यालयाचे अधिकारी / कर्मचारी, मुख्याध्यापक, पालक तसेच वनविभाग, आरोग्य विभागातील अधिकारी / कर्मचारी यांनी भेट दिली आहे. या प्रशिक्षणामुळे आदिवासी विद्यार्थ्यांना समाजात एक मानाचे स्थान प्राप्त होण्यास मदत होईल तसेच विद्यार्थ्यांना शिस्त, स्वयंअध्ययन अशा प्रकारच्या सवयी लावण्याचा प्रयत्न केला जात आहे. याचा उपयोग विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी होणार असल्याचे प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार यांनी कळविले आहे.



# सायलेंट किलरच्या भूमिकेत हायपरटेन्शन

## (जागतिक उच्च रक्तदाब दिवस विशेष)

आधुनिक केसरी

हायपरटेन्शन किंवा उच्च रक्तदाब हा जगभरात सर्वात वेगाने वाढणाऱ्या प्राणघातक आजारांच्या निर्मितीचे प्रमुख कारण आहे, ज्यामुळे लाखो लोकांचा अकाली मृत्यू होतो. अनियंत्रित उच्च रक्तदाबामुळे हृदयविकाराचा झटका किंवा स्ट्रोक, एन्युरिझम, हृदय अपयश, मूत्रपिंड समस्या, डोळ्यांच्या समस्या, चयापचय समस्या, स्मृतिभ्रंश, स्मरणशक्ती कमी होणे यासारख्या गुंतागुंत होऊ शकतात. उच्च रक्तदाबाला सायलेंट किलर म्हणतात कारण सहसा त्याची लक्षणे दिसत नाहीत आणि अचानक शरीरात आघात होतो. उच्चरक्तदाबाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी, स्थिती लवकर ओळखण्यासाठी, निरोगी भविष्यासाठी आणि उच्च रक्तदाबाच्या प्रभावी व्यवस्थापनास प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी १७ मे रोजी जगभरात "जागतिक उच्च रक्तदाब दिन" पाळला जातो. सामान्य बीपी म्हणजे रक्तदाब १२०/८० किंवा त्याहून कमी असतो. हायपरटेन्शन (उच्च रक्तदाब) तेव्हा होतो जेव्हा रक्तवाहिन्यांमधील दाब सामान्यपेक्षा जास्त (१४०/९० किंवा जास्त) असतो, ही सुरवात असते, परंतु उपचार न केल्यास ते गंभीर होऊ शकते. रक्त पंप करण्यासाठी हृदयाला सामान्यपेक्षा जास्त दाब सहन करावा लागतो. उच्च रक्तदाब माहित करून घेण्याचा एकमेव मार्ग म्हणजे रक्तदाब (बीपी) तपासणे.



डॉ. प्रितम भि. गेडाम
मोबाइल नं. 08237417041
PRIT00786@GMAIL.COM

डब्ल्यूएचओ ने उच्च रक्तदाब बाबत काही प्रमुख तथ्ये दर्शविली आहेत, जगभरात ३०-७९ वयोगटातील अंदाजे १.२८ अब्ज प्रौढांना उच्च रक्तदाब आहे, त्यापैकी बहुसंख्य (दोन तृतीयांश) कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये राहतात.



उच्च रक्तदाब असलेल्या अंदाजे ४६% प्रौढांना ही समस्या असल्याची माहिती नसते. उच्च रक्तदाब असलेल्या प्रौढांपैकी अर्ध्याहून कमी (४२%) चे निदान आणि उपचार केले जातात. उच्च रक्तदाब असलेल्या ५ पैकी फक्त १ प्रौढ (२१%) ची ही स्थिती नियंत्रणात असते. उच्च रक्तदाब हे जगभरातील अकाली मृत्यूचे प्रमुख कारण आहे, ज्यामुळे दरवर्षी ७५ लाख मृत्यू होतात, जे जागतिक स्तरावरील मृत्यूच्या अंदाजे ३० टक्के आहेत.

हायपरटेन्शनच्या जागतिक प्रभावाच्या स्थितीबाबत जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालात असे म्हटले आहे की, उच्च रक्तदाबाने त्रस्त असलेल्या निम्म्या लोकांचाही रक्तदाब नियंत्रणात ठेवला तर २०४० पर्यंत भारतात किमान ४६ लाख अकाली मृत्यू टाळता येतील. केवळ ३७ टक्के भारतीयांना उच्च रक्तदाबाचे निदान होते आणि त्यापैकी केवळ ३० टक्केच उपचार घेतात. अहवालात म्हटले आहे की, सध्या देशात उच्च रक्तदाबाचा त्रास असलेल्या केवळ १५ टक्के लोकांची स्थिती नियंत्रणात आहे. खरेतर, देशात हृदयविकाराच्या झटक्यासारख्या हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आजारांमुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी निम्म्याहून अधिक (५२ टक्के) मृत्यू उच्च रक्तदाबामुळे होऊ शकतात. जर्नल ऑफ हायपरटेन्शनच्या अभ्यासानुसार, उच्च रक्तदाबाची समस्या भारतात सर्वाधिक आहे, सुमारे ३० टक्के भारतीय या आजाराने ग्रस्त आहेत.

आपल्यापैकी ९० टक्क्यांहून अधिक लोक अशा चुकीच्या अन्नपदार्थांचे सेवन करत आहेत जे प्राण्यांनाही खाण्यास योग्य नाहीत. तेलकट, मसालेदार, खारट, मैदा, गोड आणि प्रक्रिया केलेले पदार्थ आपल्या शरीरात मंद विषासारखे कार्य करतात आणि आपल्याला घातक रोगाने आजारी करून मृत्यूकडे ढकलतात. आधुनिकता आणि दिखाऊपणा माणसाच्या विनाशाचे कारण बनले आहे, आधुनिकता फक्त आपल्या विचारात असावी, भौतिक सुख हेच सर्वस्व नाही हे माणूस समजतच नाही. भौतिक सुख सोयींवर अवलंबित्वामुळे मनुष्य मानसिक व शारीरिक दृष्ट्या बऱ्याच प्रमाणात कमकुवत झाले आहे. त्यामुळे माणसाची तग धरण्याची क्षमता, विचारशक्ती कमी झाली आहे आणि तणाव, चिडचिड, गैरवर्तन, स्वार्थीपणा सतत वाढत आहे. त्यामुळे सामाजिक समस्या, गुन्हे, विकासात अडथडा झपाट्याने वाढत असून त्याचा थेट परिणाम आरोग्यावर अतिशय वाईट होत आहे. वाढलेले वय, आनुवंशिकता, जास्त वजन किंवा लठ्ठपणा, शारीरिकदृष्ट्या सक्रिय नसणे, जास्त मीठयुक्त आहार, जास्त धूम्रपान, मद्यपान यासारख्या परिस्थितीमुळे उच्च रक्तदाबाचा धोका वाढतो. ग्रामीण लोकसंख्येच्या तुलनेत साधनसंपन्न सुविधा यंत्रणा असलेली शहरी लोकसंख्येला आजारांचा जास्त भार सहन करावा लागतो, कारण शहरात विकासाच्या नावाखाली शरीरे दुबळी झाली आहेत. प्रदूषण, ताणतणाव, खाण्याच्या चुकीच्या सवयी, व्यसनाधीनता, निद्रानाश, भेसळ, व्यायामाचा अभाव, यांत्रिक साधनांवर अवलंबून राहणे म्हणजेच आधुनिक जीवनशैली यामुळे आपण शारीरिक आणि मानसिक रूपाने आजारी आहोत. आता हृदयविकाराचा झटका किंवा पक्षाघात हा वयावर अवलंबून नसून लहान मुलांपासून ते कोणालाही कधीही होऊ शकतो. दूषित वातावरण इतके वाढले आहे की गर्भवती महिलेच्या पोटात वाढणाऱ्या बाळांमध्ये देखील अपंगत्व आणि जीवघेणे आजार वाढले आहेत. आरोग्याशी संबंधित वाढत्या समस्यांच्या मुळाशी लोकांमध्ये विशेष जागरूकता नाही. रोगांचे प्रमाण सातत्याने का वाढत आहे, यासाठी समाजात व देशात मोठ्या प्रमाणावर इतिहास घडवणारी जनजागृती आणि कठोर नियम व कायदे निर्माण करण्याची खूपच गरज आहे. आरोग्याशी तडजोड होईल असा कोणताही उपक्रम देशात होता कामा नये, ही संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची आहे आणि सरकारला पूर्ण सहकार्य करण्याची नैतिकता जनतेची आहे.

उच्चरक्तदाब रोखण्यासाठी औषधोपचार आणि आधुनिक जीवनशैलीतील बदलांसोबतच हिरव्या पालेभाज्या, हंगामी फळे अधिक खा, सतत जास्त वेळ बसणे टाळा, शारीरिकदृष्ट्या अधिक सक्रिय व्हा जसे - चालणे, धावणे, पोहणे, नृत्य किंवा वजन उचलणे यासारख्या शक्ती वाढवणाऱ्या क्रियाकलापांचा दैनंदिन दिनक्रमात समावेश करा. आपले वजन संतुलित ठेवा, तणाव कमी करा आणि नियमितपणे रक्तदाब तपासा, जर काही समस्या असेल तर योग्य उपचार घेणे आवश्यक आहे. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार औषध घ्या, काळजी घ्या. सकारात्मक विचार, सकस छंद, पौष्टिक आहार, व्यसनमुक्ती, स्वच्छता, रोजचा व्यायाम या सवयी आपल्याला आजारांपासून दूर ठेवतात. आजच्या युगातील समस्येचे सर्वात मोठे मूळ खोटे देखावे आणि लोकांकडून मोठ्या अपेक्षा हे आहे, ज्यामुळे मानवी विचार कमकुवत आहेत. जर आपण अशा निरर्थक गोष्टींपासून दूर राहिलो तर आपण भावनिकदृष्ट्या मजबूत होऊ, जे मानसिक आरोग्यासाठी खूप महत्वाचे आहे. निःस्वार्थ परोपकार, समाजसेवा, निसर्गप्रेम आणि प्राणी प्रेम, देश आणि समाजाप्रती नैतिक जबाबदाऱ्या पार पाडणे यातून मानसिक शांती आणि आंतरिक समाधान मिळते, की आपण माणूस म्हणून जगत आहोत, जे आजच्या काळात खूपच गरजेचे आहे, तणावमुक्त जीवन जगण्याचा हा एक सोपा मार्ग आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृती करंडक राज्यस्तरीय खुल्या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** इतिहासाच्या पानावर ज्यांचे नाव सुवर्ण अक्षरांनी कोरले गेले अशा कार्यकर्तृत्वान, कर्मयोगिनी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती त्रिशताब्दी महोत्सवानिमित्त विचार भारतीच्या वतीने राज्यस्तरीय खुल्या वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती स्पर्धा प्रमुख प्रा. अशोक सागडे यांनी दिली.



या स्पर्धेसाठी १) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर - एक कुशल प्रशासक. २) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे धार्मिक कार्य. ३) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कृषी धोरण. ४) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सांस्कृतिक राष्ट्रवादाचे प्रतीक असे विषय ठेवण्यात आले आहेत. सदर स्पर्धा दोन टप्प्यात होणार असून शुक्रवार दि. २४ मे न्यू आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज च्या सेमिनार हॉल मध्ये प्राथमिक फेरी होईल. या फेरीमध्ये प्रथम येणाऱ्या ५० स्पर्धकांच्या प्रवेशिका स्वीकारल्या जातील. व त्यामधून परीक्षकांच्या मूल्य मापणानुसार पहिल्या ११ क्रमांकपर्यंत स्पर्धक निवडले जातील. त्यांची अंतिम फेरी शुक्रवार दि. ३१ मे रोजी यशवंतराव चव्हाण सहकार सभागृह, स्टेशन रोड, अहमदनगर येथे होईल. व त्यामधून प्रथम, द्वितीय, तृतीय, व उत्तेजनार्थ प्रथम व द्वितीय क्रमांक परीक्षकांच्या मूल्य मापणानुसार निवडले जातील तरी इच्छुक स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदवावा.

स्पर्धेची नियमावली, बक्षिसे, प्रवेशिका फॉर्म, व इतर माहितीसाठी श्री बलभीम पठारे भ्रमणध्वनी क्रमांक ९४२०४७०००१, श्री प्रशांत जठार भ्रमणध्वनी क्रमांक ९७३०००३९२० या क्रमांकावर फोन करून माहिती घ्यावी असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. स्पर्धकांनी आपल्या प्रवेशिका दि. २१ मे पर्यंत वरील भ्रमणध्वनी क्रमांकावर पाठवाव्यात असे आवाहन विचार भारतीचे सुधीर लांडगे व अनिल मोहिते यांनी केले आहे.

# शिंदे गटाकडून किमान ५० हजार मतांचा बोनस कपिल पाटलांच्या पारड्यात हमखासच

आधुनिक केसरी न्यूज

**महेश तारमळे**

**ठाणे :** भिवंडी लोकसभेच्या निवडणूकीत राजकिय घडामोडी होत, होत्याचं नव्हत झालं आहे, अनेक आघाडीत बिघाडी झाल्या,मात्र पंचायराजमंत्री व शिंदे गटाचे जिपचे माजी उपाध्यक्ष सुभाष पवारांनी कपिल पाटलांची साथ सोडली नाही, तसही चारित्र्य संपन्न गोरगरीबांच्या मुलाना उच्चशिक्षणाची सोय करू मुरबाडचे खरे भाग्य विधाते! होय ! होय!! भाग्यविधाते असे माजी आमदार गोटीराम "भाऊ" पवारांना भरल्या ताटावरून उठविण्याच्या पापात भाजपा हि तेवढीच भागीदार असली तरी पंचायतराजमंत्र्यांनी सुभाष पवारांना चांगलीच साथ दिली होती व देत आहेतच,मुरबाड तालुक्यात सुभाष पवारांचा वडीलोपार्जित असा एक कौंटूबिक जिव्हाळा असलेला, विस्वासु वारसहक्काने चालत आलेला "मतदार" सुभाष पवारांच्या शिंदे गटा कडे आहे,येथील १२६ ग्राप पैकी ५६ ग्राप तील ६० सरपंच ८२ उपसरपंच कृषीउत्पन्न बाजार समिती ते अनेक सेवा सो ह्या पवार गटाच्या ताब्यात असल्याने ६५ हजार मतदारा पैकी ४५ ते ५० हजार मत हि या गटाची कपिल पाटलांच्या एकट्याच्या वाट्याला येणार असलाने मुरबाड तालुक्यातील मतदानात यावेळेस तरी कपिल पाटलांना आघाडी देऊन जाईल यात शंकाच नाही,तालुक्यातील भविष्यातील राजकिय घडामोडीना वळन की "वलसा " देणारी हि खासदारकी निवडणूक ठरणार आहे.




मनपा उल्हासनगर अंतर्गत नागरी आरोग्य केंद्र - १ ते ६ तसेच उपजिल्हा रुग्णालय उल्हानगर ३ येथे राष्ट्रीय डेंग्यू दिन साजरा करण्यात आला तसेच नागरिकांना कीटकजन्य आजारा बाबत माहिती देण्यात आली. हस्तपत्रक वाटप करण्यात आले.

# अजितदादा पवारांना निवडणुकीत घशाचे इन्फेक्शन

## घाटकोपर दुर्घटनेवर विरोधकांच्या आरोपांना उमेश पाटील यांनी दिले उत्तर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अजितदादा पवार नॉटरिचेबल असले की ते नाराज आहेत अशाच बातम्या माध्यमांमध्ये दाखवल्या जातात. पण ते नॉटरिचेबलही नाही आणि नाराजही नाहीत. अजितदादा पवार यांना निवडणुकीच्या कार्यकाळात घशाचे इन्फेक्शन झाले असल्याने डॉक्टरांनी काळजी घ्यायला सांगितले आहे. मात्र ते उद्यापासून प्रचारात सहभागी होतील असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला. काँग्रेसने आरोप जे केले आहेत ते योग्य नाहीत. अजितदादा यांचासारखा मासलिडर ज्यांचे महाराष्ट्रातील प्रत्येक गावामध्ये,वॉर्डात, तालुका, जिल्हयात कार्यकर्ते आहेत. मतदारांचा मोठा वर्ग आहे.पक्षाचे प्रमुख आणि राज्याचे उपमुख्यमंत्री असलेल्या नेत्याला प्रचारापासून बाजुला ठेवून कोण स्वतः चे नुकसान करुन घेईल असेही उमेश पाटील यांनी स्पष्ट केले.

राज्यात महायुतीला १५-१६ जागा मिळतील तर मविआला ३०-३५ जागा मिळतील अशी भविष्यवाणी पृथ्वीराज चव्हाण यांनी काही वर्तमानपत्रात केली आहे. तशीच शरद पवार आणि रोहित पवार यांनीही भविष्यवाणी केली आहे. राज्यात निवडणूकीचे सर्व टप्पे पूर्ण झालेले नाहीत त्यामुळे अशी भविष्यवाणी करुन पुढच्या मतदारांना प्रभावित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. पवारसाहेबांकडे दिर्घ अनुभव आहे त्यामुळे त्यांच्याबाबत बोलणार नाही. परंतु पृथ्वीराज चव्हाण हे फक्त राज्याचे माजी मुख्यमंत्री आहेत म्हणून टिव्हीवर काहीप्रमाणात टीआरपी मिळतो. पण त्यांना राज्यासंदर्भात बोलण्याचा नैतिक अधिकार नाही. राजकारणावर भाष्य करावे एवढी उंचीही त्यांची नाही. ज्या विधानसभेत ते नेतृत्व करतात त्यांना त्यांच्याकडे स्वतःची ग्रामपंचायतदेखील नाही हे केवढे मोठे दुर्दैव आहे अशा शब्दात उमेश पाटील यांनी तोफ डागली. कराड दक्षिणची जागा विलास काका पाटील - उंडाळकर हे बरीच वर्षे काँग्रेसच्या



चिन्हावर निवडून येत होते. त्या जागेवर डोळा ठेवून पृथ्वीराज चव्हाण यांनी मुख्यमंत्री असताना षडयंत्र करून विलासकाका पाटील यांना एका खून खटल्यात सहआरोपी केले. त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना अडचणीत आणण्याचे पाप केले. ते सध्या जो काही साळसूदपणाचा आव आणतात त्यावरून त्यांनी राज्याची भविष्यवाणी करु नये असा सल्लाही उमेश पाटील यांनी दिला आहे.

अजितदादा पवार यांच्या पक्षाला एकही जागा मिळणार नाही. हे मतदार ठरवतील. ४ जूनला त्याचे निष्कर्षही येतील. अहो अजितदादा पवार यांच्या पाठीशी ४०-५० आमदार आहेत. पण पृथ्वीराज चव्हाण तुमच्यासोबत किती आमदार आहेत असा संतप्त सवाल करतानाच काँग्रेसचा एकही आमदार त्यांच्या पाठीशी नाही. त्यामुळे पृथ्वीराज चव्हाण यांचे भाष्य माध्यमांनी किती गांभीर्याने घ्यावे याचादेखील विचार करावा असेही उमेश पाटील म्हणाले. पृथ्वीराज चव्हाण यांनी एकतर पोपट घेऊन भविष्यवाणी सांगण्यासाठी बसावे. निदान पोपटाच्या नादाने तरी काहीजण तुमच्यावर विश्वास ठेवतील असा टोला लगावतानाच राष्ट्रवादी काँग्रेसच्या विरोधात भाष्य करण्याच्या भानगडीत पडू नये असा इशारा दिलाच शिवाय आधी आपली सार्वजनिक जीवनातील पत किती आहे हे तपासून पहावे अशी जोरदार टीकाही उमेश पाटील यांनी केली. अहो आता माझी गाडी तपासली तरी माझ्या गाडीत ३-४ बॅगा सापडतील. माझ्यासारखा छोटा कार्यकर्ता राज्यात प्रचारासाठी फिरत असताना एवढे साहित्य ठेवतो. त्यामुळे राज्याचे मुख्यमंत्री दौरा करणार त्यावेळी त्यांचे सामान सोबत असणारच आहे. शिवाय कर्मचारीही सोबत असतात त्यांचेही सामान असणार आहे. त्यात एवढे गहजब करण्याची काय आवश्यकता असा थेट सवाल उमेश पाटील यांनी विरोधकांना केला आहे. लोकसभा निवडणुकीसंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे दौरे देशभर सुरु आहेत. त्यांच्या दौऱ्याचे नियोजन काटेकोरपणे केलेले असते. त्यामुळे सुरक्षेच्यादृष्टीने घाटकोपर दुर्घटनेच्या ठिकाणी अशी परवानगी दिली गेली नाही. यापूर्वी या देशाचे दोन पंतप्रधान सुरक्षेच्या कारणास्तव गमावलेले आहेत. म्हणून सुरक्षा यंत्रणा काळजी घेत असते आणि त्यामुळेच प्रचाराचा कार्यक्रम सोडून तिथे भेट देणे शक्य झाले नाही असे सांगतानाच बेकायदेशीर होर्डिंगसंदर्भात कायदा बनवावा अशी मागणी येणाऱ्या अधिवेशनात राष्ट्रवादी काँग्रेस करेल असेही उमेश पाटील यांनी स्पष्ट केले.

# पोटाला जात नसते, तर जातीला पोट असते

## निवडणूकीत जातीच्या मतावर डोळा ठेवून मनोरंजन सुरू



आधुनिक केसरी न्यूज

**महेश तारमळे**

**ठाणे :** अखेर जिजाऊ संघटना भिवंडी लोकसभेसाठी अपक्ष म्हणून निवडणूक रिंगणात उतरली, त्यांना मिळणाऱ्या मतामुळे कपिल पाटील यांना की महाविकास आघाडीला फायदा होईल याबाबत तर्क वितर्क सुरू झाले आहेत. मुरबाड विधानसभा मतदार संघात कपिल पाटील दोन वेळ खासदार व तीन वर्ष पंचायतराजमंत्री असल्याने त्याच्या सोबत भाजपा पक्ष कार्यकर्त्यांची फौज कामाचा उभा केलेला डोंगर व दोन वेळचा सलग लाखोच्या फरकाने विजयी होण्याची किमया व सर्वच पक्षातील नेत्या सोबत जिव्हाळ्याचे संबंध असल्याने त्यांच्या विरोधात जाहिरपणे जाणारा एकही नेता पुढारी या मतदार संघात नाही,कपिल पाटलांना सक्षम असा विरोधक या मतदार संघात नाहीच.

निलेश सांबरे यांच्या उमेदवारीमुळे कपिल पाटील यांचे समर्थक आनंदी झाले आहेत कारण आता कपिल पाटील यांच्या विरोधात जाणारी मते बाळ्या मामा व सांबरे या दोघांमध्ये विभागली जांतील असा त्यांचा अंदाज आहे निलेश सांबरे हे कुणबी कार्डाचा वापर करण्याचे दिवास्वप्न पाहत असतील तर विश्वनाथ पाटिल उमेदवार असताना देखील त्यांना कुणबी समाजाने सपसेल नाकारून कपिल पाटलांना मतदान केले होते,कुणबी समा जातील तरूण पिढी उच्चशिक्षीत असल्याने त्यांना आपलं कोण परकं कोण विकास काय व मतलबी कोण हे समजत असल्याने कुणबी समाजाला दावणीला बांधायचं दिवस कधीच संपले आहेत कोणी कितीही वल्गना करीत असेल तरी त्यांनी जातीच्या नावे केवळ आपलं मनोरंजन करून घेत आहेत,केवळ वातावरण निर्माण करणे चालू आहे,जिजाऊ संघटनेचे बोर्ड गावोगावी लागले असले तरी त्यांना भक्कम जनाधार नाही अशी चर्चा आहे,त्यांच्या सामाजिक कार्यापेक्षा त्यांचे कंपनीने शहापूर,मुरबाड,कर्जत रस्त्याचे भिजत ठेवलेले घोंगडे त्यांचे विरोधात वातावरण निर्माण झाले आहे. कोलठण सारख्या कुणबी समजाच्या गावात दगड खाणी मुळे लोकांच्या घराला गेलेले तडे व त्या खाणी मुळे लोकांना पोलीस ठाण्यात मारावे लागलेले हेलपाटे लोक विसरलेले नाहीत.

एका बाजूला जिजाऊ संघटने मार्फत चालवल्या जाणाऱ्या रुग्णालये व सामाजिक उपक्रमांचा विचार केला तरी त्यांचे मुरबाड तालुक्यात विशेष असे काम दिसत नाही दुसऱ्या बाजूला शहापूर,मुरबाड,कर्जत रस्त्यामुळे गेलेले बळी व जखमी झालेल्या लोकांच्या कुटुंबीयांचे शिव्या शाप त्यांना भोगावे लागतील अशी चर्चा आहे या रस्त्यावर झालेल्या अपघातामध्ये जखमी झालेल्या व मरण पावलेल्या लोकांचे नातेवाईक त्यांना माफ करतील असे दिसत नाही तर या रस्त्यावरून प्रवास करणारे लोक त्यांना सतत शिव्या शाप देताना दिसतात.

बाळ्या मामा म्हात्रे हे उमेदवार तसे मुरबाड मतदार संघात फारसे परिचित नाहीत पण त्याचे समर्थक त्यांचे साठी किती काम करतात यावर त्यांना मिळणाऱ्या मतांची वजाबाकी अवलंबून आहे,या पार्श्वभूमीवर बाळ्या मामा म्हात्रे यांचे साठी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते किती सक्रिय राहतील या बाबत शंका व्यक्त केली जात आहे.

निवडणूक रिंगणात उतरणार असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे बाळ्या मामा व अपक्ष उमेदवार निलेश सांबरे या दोन उमेदवरां समोर भाजप उमेदवार कपिल पाटील हे तगडे उमेदवार आहेत मुरबाड मतदार संघात त्यांचा नियमित संपर्क आहे भाजप बरोबर इतर पक्षांचे कार्यकर्ते सुद्धा नियमित पणें त्यांचे संपर्कात असतात शिवसेना नेते ठाणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुभाष पवार व माजी आमदार गोटीराम पवार यांचे बरोबर त्यांचे चांगले संबंध आहेत पक्ष शिस्त म्हणून आमदार किसन कथोरे यांना कपिल पाटील यांचे काम करत असल्याचे दाखवावे लागेलया पार्श्वभूमीवर मुरबाड मतदार संघात कपिल पाटील यांचे पारडे जड ठरणार असल्याचे चित्र सध्या दिसत आहे.

# कॅरीबॅगचा पुरवठा सुरूच; परतूर नगरपरिषद कारवाई कधी करणार?

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** सरकारच्या नविन दुरुस्ती प्रमाणे 50-मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक कॅरीबॅग बंदीच्या निर्णयाचे समर्थन नागरिक आणि दुकानदार करत असले, तरी प्लास्टिक कॅरीबॅगचा सरास्पने वापर सुरू असल्याचे परतूर शहरात दिसून आले, मात्र परतूर शहरातील बहुतांश दुकानदाराकडे अजून ही कॅरीबॅग विक्री केली जाते, हे सरासपने निदर्शनात येत आहे.

परतूर नगर परिषदचे अधिकारी च्या कारवाही कधी करणार. सरकारी अधिकाऱ्यारी व्यापारांवर कठोर कारवाही करत नसल्याने ही स्थिती निर्माण झाली आहे का परतूर शहरातील परिस्थिती बिकट होत चालली का? कापड दुकानदार, दूध विक्री करणारा, स्विट मार्ट वाले, किराणा दुकानदार, हॉटेल, मासे विक्री, मटण, चिकन विक्री, फळ विक्री करणारे, धाबेवाले, असे असंख्य दुकानात निकृष्ट दर्जाचे सरास पणे कॅरीबॅग (प्लस्टिक विक्री केली जात आहे. विक्री सुरु असून त्याच्यावर अद्याप कारवाई झाली नाही पर्यावरणाला घातक असलेल्या प्लॅस्टिकबंदीला बंदी घालण्यात आले नाही? कॅरीबॅग सर्रास विक्री सुरूच आहे. प्लास्टिक पिशव्या पूर्ण बंद झाल्या तर तुम्ही ग्राहकांना काय द्याल? तर कागदी पिशव्या, कापडी पिशव्या, वृत्तपत्रांपासून बनविलेल्या पिशव्याचे वापर करावे. प्लॅस्टिकबंदीबाबत काही सुजाण ग्राहकांकडून सातत्याने कापडी व कागदी पिशव्याची मागणी करण्यात येथे मात्र, आमच्याकडे कागदी व कापडी पिशव्या उपलब्ध नाहीत असे काही व्यापारी उडवा उडवीचे उत्तर देण्यात येते. व्यापाऱ्यांची मानसिकता बदलण्यासाठी सरकारी यंत्रणा कमी पडताना दिसत आहे.



प्लास्टिक बंदी कायदा अंमलमध्ये येऊन जवळपास एक दीड वर्ष पूर्ण होत आहे . तरी कॅरीबॅग ( प्लास्टिक ) विक्री आणि वापरावर . परतूर व्यापाऱ्यांनी कॅरीबॅग बंद करण्याला सकारात्मक प्रतिसाद दिला जात नाही . याला जबाबदार प्रशासन आहे . प्लास्टिक कॅरीबॅग बंदीनंतरही परतूर शहरातील वेगवेगळ्या भागात सर्रास पणे होणारा प्लॅस्टिक कॅरीबॅगचा पुरवठा थांबविण्यात सरकारी यंत्रणेला अपयश आले आहे . परतूर शहरात तात्काळ प्लास्टिक बंदी करा अन्यथा आंदोलन करण्यात येईल . **अर्जुन राठोड, बंजारा ब्रिगेड, महाराष्ट्र सचिव**

# बोगस बिलाची चौकशी करा : उपसरपंचासह ग्रामपंचायत सदस्य यांची तक्रार

आधुनिक केसरी न्यूज

**मेहकर :** तालुक्यातिल डोणगांव येथून जवळच असलेल्या ग्राम विठ्ठलवाडी येथे ग्रामपंचायत ने काम न करता बोगस बिले काढल्याची तक्रार विठ्ठलवाडी येथील उपसरपंच रमेश केशवराव खोडके सह ग्रामपंचायत सदस्य यांनी गटविकास अधिकारी मेहकरयांना 16 मे ला केली आहे. त्यांनी आपल्या निवेदनात ग्रामपंचायत विठ्ठलवाडी येथील सन 2023 व 24 या कारकीर्दीत झालेल्या व्यवहारात तसेच कामकाजाची पडताळणी करीत असता असे निर्देशनास आले आहे की जनरल सामान्य फंड व पाणी पुरवठा या खात्यातून सरपंच व सचिव यांनी बोगस बिले काढलेली आहेत संतोष उमाजी शेजुळ या व्यक्ती च्या नावाने ग्रामपंचायत हद्दीत कुठल्याही प्रकारची कामे केलेली नाही तरी या व्यक्ती च्या नावाने तसेच अनेक बिले सचिव व सरपंच यांनी ग्रामपंचायत सदस्य व उपसरपंच यांना विश्वासात न घेता बिले काढलेली आहेत याबाबत सरपंच व सचिव यांना मासिक मिटिंग मध्ये विचारणा केली असता त्यांनी आम्ही पैसे काढले व पंचायत समिती मधील



साहेबांना दिले असे सांगितले याबाबत आमच्या कडे व्हीडीओ क्लिप पुरावे आहेत यांची चौकशी करण्यात यावी अशी मागणी केली आहे या निवेदनात रमेश खोडके जीवन मधुकर राठोड जिला शामराव राठोड सुमित्रा विलास गावडे सपना जाधव आदी ग्रामपंचायत सदस्य यांच्या सह्या आहेत.

# दिव्यांग सशक्तीकरणासाठी मोदींच्या हमीवर विश्वास

## नमो दिव्यांग अभियानाचे राष्ट्रीय समन्वयक विकास शर्मा यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारच्या निर्णयांमुळे दिव्यांगांच्या सशक्तीकरणासाठी मोठी मदत झाली आहे. दिव्यांगांसाठी घेतलेल्या निर्णयांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी नमो दिव्यांग अभियान भारतने या निवडणुकीत भारतीय जनता पार्टी आणि महायुती उमेदवारांना आपला पाठिंबा जाहीर केला आहे, अशी माहिती नमो दिव्यांग अभियान भारत चे राष्ट्रीय समन्वयक विकास शर्मा यांनी गुरुवारी दिली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत श्री.शर्मा बोलत होते. यावेळी भाजपा प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, निरंजन जाधव उपस्थित होते. या अभियानाचे सदस्य असलेले सर्व श्रेणीतील दिव्यांग बंधूभगिनी या निवडणुकीत भाजपा-एनडीए, महायुतीच्या उमेदवारांना समर्थन देतील अशी ग्वाहीही शर्मा यांनी दिली.

दिव्यांगांच्या उन्नतीसाठी संबंधित कायद्यामध्ये संशोधन करून त्यात बदल करण्याची मागणी अनेकदा करूनही त्याकडे आधीच्या सरकारांनी दुर्लक्ष केले. मात्र दिव्यांगांच्या न्याय्य मागण्यांची दखल घेत भाजपा-एनडीए सरकारने दिव्यांगांच्या सशक्तीकरणासाठी अनेक पावले उचलली. 2016 साली दिव्यांगजन अधिकार अधिनियम पारित करून मोदी सरकारने अनेक वर्षांपासूनची दिव्यांगवर्गाची मागणी पूर्ण केली. अपंग, विकलांग या नकारात्मक संबोधनाऐवजी 'दिव्यांग' या सकारात्मक शब्दाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या वर्गाला सन्मान दिला. हीन, दीन, दया या श्रेणीतून या वर्गाला बाहेर काढून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले असे श्री. शर्मा म्हणाले. राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यात दिव्यांगांना स्थानच नसे. मात्र भाजपाच्या 2014, 2019 आणि 2024 च्या जाहीरनाम्यांमध्ये दिव्यांगांच्या उन्नतीसाठी आणि त्यांना प्रमुख प्रवाहात आणण्यासाठी अनेक आश्वासने दिली. या



आश्वासनांची गेल्या 10 वर्षांत पूर्तताही केली. या निवडणुकीसाठीच्या संकल्पपात्रात भारतीय जनता पार्टीने दिव्यांगांना आवश्यक तांत्रिक उपकरणांच्या आधुनिकीकरणासाठी विशेष प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले आहे, याकडे श्री.शर्मा यांनी लक्ष वेधले. पंतप्रधान दिव्यांग आवास योजना 2024 द्वारे दिव्यांगांच्या विशिष्ट गरजांनुसार परवडणारी आणि सुगम्य घरे बांधली जाणार आहेत. या निवडणुकीत राजस्थानमधील चुरू लोकसभा मतदारसंघातून दिव्यांग असलेल्या देवेंद्र झांझरीया यांना उमेदवारी देऊन पंतप्रधान मोदी यांनी राजकारणात नवा अध्याय लिहीला असल्याचे श्री.शर्मा यांनी नमूद केले. मोदी सरकारने दिलेल्या प्रोत्साहन आणि पाठिंब्यामुळेच दिव्यांग खेळाडू आज विविध आंतरराष्ट्रीय क्रिडा स्पर्धांमध्ये नेत्रदिपक कामगिरी करत आहेत असेही ते म्हणाले.

एनडीए सरकार सत्तेत आल्यास दिव्यांगांच्या कल्याणासाठी झटणाऱ्या नमो दिव्यांग अभियान भारतला ही त्यामुळे बळ मिळेल. दिव्यांग वर्गाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी मानवी दृष्टीकोनातून अनेक प्रयत्न आणि उपाययोजना मोदी सरकारने केल्या आहेत आणि यापुढेही करतील हा विश्वास दिव्यांगवर्गाला आहे. मजबूत राष्ट्र निर्माणासाठी, दिव्यांगवर्गाच्या सशक्तीकरणासाठी दिव्यांग बंधुभगिनींनी अधिकाधिक संख्येंने घराबाहेर पडून महायुती आणि भाजपा-एनडीए च्या उमेदवारांना विजयी करावे असे आवाहनही श्री.शर्मा यांनी केले. दिव्यांग मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा, तसेच मतदान केंद्रावर पोहोचून त्यांना मतदान करणे सोपे व्हावे यासाठी निवडणूक आयोगासोबतच नमो दिव्यांग अभियान भारत चे सर्व कार्यकर्ते मदत करतील असेही ते म्हणाले.

# फर्दापूर परिसरात आक्षेपार्ह पोस्ट टाळा, आचारसंहिता पाळा: स.पो.नि. साबळे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर व सावळदबारा परिसरात



आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर १६ मार्चपासून आदर्श आचारसंहिता लागू केली आहे. त्यामुळे समाज माध्यमांवर पोलिसांची करडी नजर असणार असून, आक्षेपार्ह पोस्ट टाळा, आदर्श आचारसंहिता पाळा, असे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रफुल्ल साबळे यांनी केले आहे.

अप्पर जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी २० मार्च ते १८ मे २०२४ दरम्यान संपूर्ण जिल्ह्यात जमावबंदी तसेच प्रतिबंधात्मक आदेश जारी केलेले आहेत. कोणत्याही उमेदवार व त्याच्याशी संबंधितांची वैयक्तिक, कौटुंबिक अगर सामाजिक स्तरावर अवहेलना होईल, अशी आक्षेपार्ह टीकाटिप्पणी करणे, मजकूर, छायाचित्र, चलचित्र यांत बदल करून प्रसारित करणे अथवा आलेल्या संदेशावर आक्षेपार्ह मत व्यक्त, प्रकट करणे, पुढे पाठविणे, मतदाराचे मन वळविण्यासाठी कोणत्याही धर्माच्या लोकांच्या धार्मिक, भाषिक तसेच जाती-जातींत द्वेष पसरविणारे आक्षेपार्ह मजकूर, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय एकात्मतेला बाधा निर्माण होईल, अशा प्रकारे स्वतंत्र समाज माध्यमावर ग्रुप निर्माण करून त्याद्वारे अक्षेपार्ह मजकूर, छायाचित्र, चलचित्रात बदल करून प्रसारित करणे अथवा कृत्य करणे याबाबी निषिद्ध असून, निवडणूक आयोगाच्या सूचनांचे पालन करणे हे नागरिकांना बंधनकारक राहील.

कोणत्याही नागरिकाकडून अथवा समाज माध्यमावर तयार केलेल्या ग्रुपवरील चुकीच्या पोस्ट अथवा मॅसेजमुळे दोन समाज, धर्म, गट, व्यक्ती, पक्ष, संघटना यांच्यात तणाव, तेढ निर्माण होऊन आचारसंहितेचा भंग होऊन कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास संबंधित व्यक्तीस सर्वस्वी जबाबदार धरून त्याच्याविरुद्ध प्रचलित कायद्यानुसार उचित कारवाई करण्यात येईल. ही नोटीस न्यायालयात पुरावा म्हणून सादर करण्यात येईल, तरी सूचनांचे काटेकोर पालन करून प्रशासनास सहकार्य करावे, असे फर्दापूर पोलिस ठाण्याचे सपोनि प्रफुल्ल साबळे यांनी आवाहन केले आहे.



# नारंडा ता. कोरपना येथे एक दिवसीय शेतकरी, अधिकारी/कर्मचारी प्रशिक्षण

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** कृषी संशोधन केंद्र, एकार्जुना (डॉ. पंदेकृवि, अकोला) द्वारे "पिडीकेव्ही इंडो काउंट सेंटर ऑफ एक्सलेन्स फॉर कॉटन" या प्रकल्पाअंतर्गत कृषि विभाग चंद्रपूर, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला आणि दालमिया भारत फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय शेतकरी आणि कृषि विभागातील अधिकारी / कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षणाचे दि. १४/०५/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता अहिल्याबाई होळकर सभागृह, नारंडा ता- कोरपना येथे आयोजन करण्यात आले होते. शेतकरी आणि कृषि विभागातील कर्मचारी व अधिकारी यांचे करिता मान्सून पूर्व तयारी तसेच कापूस लागवड तंत्रज्ञान, कपाशीचे विविध वाण, गुलाबी बोंड अळीचे नियंत्रण, सोयाबीन लागवड तंत्रज्ञान, बीजप्रक्रिया, इत्यादि विषयावर प्रशिक्षण देण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी मा. सौ. अनुसया ताजणे, सरपंच, नारंडा तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री. शंकरराव तोटावार, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, चंद्रपूर, डॉ. श्रीकांत अमरशेट्टीवार, प्रकल्प प्रमुख तथा प्रभारी अधिकारी, कृ. स. के. एकार्जुना, आणि श्री. लिलाधर मेश्राम, विभागीय व्यवस्थापक महाबीज, नागपूर उपस्थित होते. या एक दिवसीय शेतकरी व अधिकारी / कर्मचारी प्रशिक्षण कार्यक्रमास श्री. नरेश परसुटकर, पोलिस पाटील, नारंडा, श्री. गोविंद ठाकूर, ता.कृ.अ. कोरपना आणि श्री. प्रशांत भिमनवार, लोकेशन लिड, दा. भा. फा. नारंडा यांची प्रमुख उपस्थिती होती. श्री. शंकरराव तोटावार, जि. अ.कृ.अ. यांनी सोयाबीनच्या अष्ठसूत्री लागवड तंत्रज्ञान, सेंद्रिय कर्ब, सोयाबीन पीक लागवड पद्धती, सुधारीत वाण, बिजोत्पादन तंत्रज्ञान या विषयांवर उपस्थितांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी डॉ. श्रीकांत अमरशेट्टीवार यांनी कपाशी पिकांचे लागवडीसाठी विविध वाण, व त्यांचे वैशिष्ट्ये, कापूस लागवड तंत्रज्ञान, गुलाबी बोंड अळींचे एकात्मिक व्यवस्थापन तसेच कपाशी पिकाचे महिनानिहाय नियोजन आणि बीजप्रक्रिया या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. श्री. लिलाधर मेश्राम, विभागीय व्यवस्थापक महाबीज यांनी महाबीजनिर्मित सोयाबीन, पपई आणि केळीच्या वाणांची माहिती दिली. सौ. अनुसया ताजणे, सरपंच, नारंडा यांनी अध्यक्षीय भाषणाद्वारे शेतकऱ्यांना उत्पादन वाढीसाठी आवाहन केले. याप्रसंगी चर्चा सत्रामध्ये शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांना उत्तरे सुद्धा देण्यात आली. कार्यक्रमाची प्रस्तावना श्री. अजय फुलझेले, जिल्हा व्यवस्थापक महाबीज, चंद्रपूर यांनी केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. शरद ढवळे तर आभार प्रदर्शन श्री. नरेश परसुटकर, पोलिस पाटील, नारंडा, यांनी केले. या प्रसंगी ८५ शेतकरी व कृषि विभागातील कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दालमिया भारत फाऊंडेशन, तालुका कृषि अधिकारी कोरपना व मंडळ कृषि अधिकारी, कृषि सहाय्यक इत्यादि यांनी परिश्रम घेतले.

# उरणमधील अनधिकृत होर्डिंग्जवर कारवाई करावी; उरण तालुका मराठी पत्रकार संघ

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** तालुक्यात सिडको व इतर शासकीय जागेवर अनधिकृत होर्डिंग्जचे साम्राज्य उभे राहिले आहे. यावर शासकीय यंत्रणेकडून आर्थिक साटेलोटामुळे कारवाई होत नाही. या होर्डिंग्जमुळे दुर्घटना घडण्याच्या घटनेत वाढ होत आहे. घाटकोपर येथे झालेल्या दुर्घटनेत १४ जणांचा बळी गेला तर कित्येकजण जखमी झाले आहेत. तरी उरण तालुक्यातील अनधिकृत होर्डिंग्जवर ठोस कारवाई करण्याची मागणी उरण तालुका मराठी पत्रकार संघाने केली आहे. अन्यथा घाटकोपर सारखी घटना उरणमध्ये घडण्यास वेळ लागणार नाही.

सोमवार दि. १३ मे२०२४ रोजी संध्याकाळ मुंबईकरांसाठी नवं आव्हान घेऊन आली होती. घाटकोपर छेडा नगर परिसरातील १२० बाय १२० फुटाचं होर्डिंग कोसळल्याने तब्बल १४ जणांचा हकनाक जीव गेला. मुंबईसह राज्यात सर्वत्र होर्डिंगचं जाळं पसरलेलं दिसत आहे.

१२० टन वजनाचं होर्डिंग पेट्रोल पंपावर कोसळल्याने १०० दबले गेल्याची भीती व्यक्त करण्यात आली होती. सकाळी आलेल्या आकडेवारीनुसार या दुर्घटनेत तब्बल १४ जणांचा मृत्यू झाला, तर ४५ जणांवर अद्याप रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यापूर्वी दि. १८ एप्रिल २०२३ रोजी पिंपरी चिंचवड रावेत परिसरात होर्डिंग पडून निष्पाप नागरिकांचा बळी गेला आहे. मुळातच व्यावसायिक हेतूने उभारण्यात येणाऱ्या या होर्डिंग्जचा दर्जा व मजबुतीची अधूनमधून स्ट्रक्चरल ऑडीट होणे आवश्यक आहे. जिथे अनधिकृत होर्डिंग्ज असतील तिथे कारवाई होणे आवश्यक आहे. अशाच प्रकारचे उरण परिसरात मोठमोठे होर्डिंग्ज उभारण्यात आले आहेत. त्यामध्ये अनेक अनधिकृत आहेत. यावर कारवाई करण्याची मागणी उरण तालुका मराठी पत्रकार संघाने वारंवार करूनही सिडको व इतर शासकीय यंत्रणा याकडे आर्थिक हितसबंधामुळे दुर्लक्ष करीत आहेत. तरी घाटकोपर येथील दि. १३ मे रोजी घडलेल्या दुर्घटनेची दखल घेऊन त्वरित अशा उरण मधील अनधिकृत होर्डिंग्जवर कारवाई करण्याची मागणी उरण तालुका मराठी पत्रकार संघाने सिडको प्रशासनाकडे केली आहे.

# पटेल यांच्या विरोधात शरद पवार गटाचे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपरी- चिंचवड :** राष्ट्रवादी शरद पवार गटाने प्रफुल्ल पटेल यांचा जाहीर निषेध केला आहे. वाराणसीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रफुल्ल पटेल यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा जिरेटोप घातला होता. यावरून आता महाराष्ट्रात वाद निर्माण झाला आहे. शरद पवार गटाने पिंपरीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात तोंडाला काळ्या पट्ट्या बांधून मूक निषेध करत प्रफुल्ल पटेल यांनी जाहीर माफी मागावी अशी मागणी शरद पवार गटाचे युवक शहराध्यक्ष इमरान शेख यांनी केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाराणसी लोकसभा मतदारसंघामधून मंगळवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि प्रफुल्ल पटेल यांच्यासह एनडीएतील घटक पक्षाचे प्रमुख नेते उपस्थित होते. यावेळी प्रफुल्ल पटेल यांनी पंतप्रधान मोदींना खास भेटवस्तू देत त्यांच्या डोक्यावर जिरेटोप चढवला होता. मात्र, या जिरेटोपावरून नवीन वादाला तोंड फुटले आहे. पिंपरीतील चौकात राष्ट्रवादी शरद पवार गटाने प्रफुल्ल पटेल यांचा जाहीर निषेध करत मूक आंदोलन केले आहे. याप्रकरणी प्रफुल्ल पटेल यांनी जाहीर माफी मागावी अशी मागणी यावेळी शरद पवार गटाने केली आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचं आराध्य दैवत आहेत. वारंवार भाजपकडून महापुरुषांबद्दल अपमानास्पद वक्तव्य केले जात आहेत. माजी राज्यपाल यांनी देखील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल आक्षेपार्ह विधान केलं होतं. अशी आठवण राष्ट्रवादी शरद पवार गटाचे युवक शहराध्यक्ष इम्रान शेख यांनी करून दिली आहे.

# काँग्रेस नेते साजिद खान यांची मौलवींना शिवीगाळ

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** मुस्लिम समाजाचे धर्मगुरू मौलवी यांना शिवीगाळ करून ॲड. प्रकाश आंबेडकरांविषयी अपशब्द वापरल्याप्रकरणी काँग्रेस नेते साजिद खान पठाण यांच्यावर अकोल्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी वंचित बहुजन आघाडीच्यावतीने बुधवारी विविध पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर डाबकी रोड पोलीस ठाण्यात साजिद खान पठाण यांच्यावर गुन्हा नोंदविण्यात आला आहे. वंचित बहुजन आघाडीचे महानगर महासचिव गजानन गवई यांनी डाबकी रोड पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, साजिद खान पठाण यांनी १० मे रोजी मुस्लिम समाजाचे धर्मगुरू मौलवी हाफिज नजीर यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधला. ॲड. प्रकाश आंबेडकरांना मतदान करण्याचे आवाहन का केले? या कारणावरून अश्लील भाषेत शिवीगाळ केली. सोबतच ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्याविषयी अपशब्द बोलून मौलवी यांना भ्रमणध्वनीवरून धमक्या दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. साजिद खान यांच्या संभाषणाची ध्वनिफित समाजमाध्यमातून प्रसारित झाली. साजिद खान पठाण यांनी जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या अगोदर देखील त्यांनी मौलवींची बदनामी केल्याचे देखील तक्रारीत म्हटले आहे.

# पाण्याची सोय नसल्यामुळे शेतकऱ्यांकडून संताप व्यक्त

## तालुका कृषी कार्यालयात पिण्याच्या पाण्याचा विषय बनला संशोधनाचा

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** शहरातील तालुका कृषी कार्यालय येथे पाण्याची सोय करणे आवश्यक आहे. परंतु,तालुका कृषी कार्यालय पिण्याच्या पाणीसाठी कृषी कार्यालय अधिकारी व वरिष्ठ अधिकारी याकडे कधीच लक्ष देत नाही. परिणामी उष्णतेची धर्माबाद तालुक्यामध्ये सद्या लाट प्रसली आहे. याच लहाटीमध्ये शेतकरी घराबाहेर पडलेल्या नागरिकांना पाणी पिण्यासाठी पुन्हा घरीच जावे लागते. किंवा हॉटेलमधून पाण्याची बाटली खरेदी करून आपली तहाण भागवावी लागते. धर्माबाद तालुका कृषी कार्यालय पाण्याची सोय नाही नागरिकांची वर्दळ असते. परंतु, या ठिकाणी आता पिण्याच्या पाण्याची सोयच नसल्याने गरिबांना तोंडचे पाणी गिळून गप्प रहावे लागत आहे. तर,



हॉटेल किंवा टपरीमध्ये उपलब्ध पाण्यावर तहाण भागावावी लागत आहे.  तालुका कृषी अधिकारी साहेब कार्यालयामध्ये आलेल्या शेतकऱ्यांना पाण्याची सोय करून देऊन  पाण्याचे पुण्य पदरात पाडून घेतील का?  तालुका कृषी कार्यालयात पाण्याची व्यवस्था नसल्यामुळे कार्यालयात अधिकाऱ्यांसाठी मिनरल वॉटर, कार्यालयातील कर्मचारी हे वाटर

कृषी कार्यालयात आलेल्या शेतकऱ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करून देतील का? याकडे धर्माबाद तालुक्यातील जनतेचे लक्ष वेधले आहे.
सद्या धर्माबादमध्ये 42% सेल्स उष्णतेची नोंद होत आहे याच उष्णतेच्या लाटेमध्ये शेतकरी हे कृषी कार्यालयाचे चकरा मारत असल्यामुळे धर्माबाद शहरातील कृषी कार्यालय येथे शेतकऱ्यांना पिण्याची पाण्याची सोय करण्यात यावी अशी शेतकऱ्यांकडून मागणी होत आहे.

प्लांट येथून जार भरून आणून कर्मचारी आपली तहान भागवत आहेत. कर्मचाऱ्यांना शेतकरी जर विचारले असता पाणी कुठे आहे तर बाहेर हॉटेलमध्ये पाणी आहे असे कर्मचारी म्हणत आहेत असे शेतकऱ्यानी सांगितले. परंतु, नागरिकांना तोंडचे पाणी गिळून घर गाठावे लागत असतानाच हॉटेलमध्ये जाऊन पाण्यासाठी चहा प्यावा लागतो, हे विशेष.

तहान लागली की पूर्वी चौका चौकामध्ये पाणपोई असायची रस्त्याने जाता येता घशाला पडलेली कोरड दूर करताना चार घोट गार पाणी खाली उतरले की हायसे वाटायचे. शहरातील तालुका कृषी कार्यालय येथे शेतकऱ्यांसाठी पिण्याचे पाणी नसल्यामुळे शेतकऱ्यांकडून संताप व्यक्त होत आहे. तालुका कृषी कार्यालयातील कर्मचारी शहरातील वाटर प्लांट येथे जाऊन एक जार भरून आणून कर्मचारी आपली तहान भागवत आहेत मात्र शहरातील तालुका कृषी कार्यालय येथे  शेतकऱ्यांची तहान कोण भागवेल? याकडे धर्माबाद तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष वेधले आहे कार्यालय मध्ये आलेल्या शेतकऱ्यांना पाणी मिळेल का असा संताप जनक प्रश्न उपस्थित होत आहे धर्माबाद शहरातील तालुका कृषी कार्यालय येथे आलेल्या शेतकऱ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय नसल्यामुळे धर्माबाद तालुक्यातून तालुका कृषी कार्यालय येथे आलेल्या शेतकऱ्यांकडून संताप व्यक्त होत आहे त्यामुळे,  तहानलेल्याला शेतकऱ्यांना घोटभर पाणी पिऊ घालणे, ही आपली संस्कृती आहे, मात्र  पिण्याच्या पाण्याची सोय तालुका कृषी कार्यालय येथे कृषी अधिकारी साहेब करून देतील का  ?याकडे धर्माबाद तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष पिण्याचे पाणी उपलब्ध करून देतील का? शहरातील कार्यालयामध्ये आलेल्या शेतकऱ्यांनी परीणामी नागरिकांना पाणी पिण्यासाठी पुन्हा घरीच जावे लागते. किंवा हॉटेलमधून पाण्याची बाटली खरेदी करून आपली तहाण भागवावी लागते. धर्माबाद शहरातील तालुका कृषी कार्यालय येथे शेतकऱ्यांना पिण्याची पाण्याची व्यवस्था नसल्यामुळे धर्माबाद तालुक्यातील शेतकऱ्याकडून संताप व्यक्त होत आहे.



# अवकाळीच्या रिमझिमने धाराशिव शहरातील गटारींना आला महापूर

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** शहरात सध्या सुरू असलेल्या अवकाळी पावसाची साधी रिमझिम आली तरी पावसाचे पाणी तुंबलेल्या गटारीमुळे रस्त्यावरून वाहत आहे.

या तुंबलेल्या गटारी धाराशिव करांचे आरोग्य धोक्यात आले आहे. यंदाच्या पावसाळ्याने लवकरच आगमनाची तयारी चाहूल दिली आहे. यंदा मान्सून नेहमीपेक्षा लवकर येईल, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. याचं पार्श्वभूमीवर नगरपालिकेने शहरातील नालेसफाई वेळेतच करण्याची अपेक्षा आहे. मात्र, अद्याप पर्यन्त तरी शहरातील गाण्यांचा गाळ काढण्यात आलेला नाही. शहरातील मुख्य रस्त्यावरील गटारी ह्या गाळाने, प्लास्टिकच्या कॅरीबॅग, फळ विक्रेत्यांकडून सडलेली फळे तिथेच गटारीत फेकल्यामुळे  पावसाळ्यात गटारी तुंबत आहेत. पाऊस पडल्यानंतर पावसाचे पाणी गटारात जाऊन या गटारीचे दुर्गंधीयुक्त पाणी रस्त्यावर येते त्यामुळे नागरिकांना या घाण पाण्यातूनच वाट काढत चालावे लागते.

तसेच नालेसफाई न झाल्यामुळे  गटारीत पाणी तसेच तुंबून हे पाणी व्यापाऱ्यांच्या दुकानातही  शिरल्याने लाखोंचे नुकसान होते. नागरिक आणि व्यापाऱ्यांना दरवर्षी असा अनुभव येऊनही पालिका प्रशासन नालेसफाई करण्याविषयी गंभीर असल्याचे दिसत नाही. दरवर्षी नाले सफाईवर लाखो रुपये खर्च होतो. मात्र, गटारींतील गाळ काढला जात नाही. नेहमीप्रमाणेच या वर्षीही तीच परिस्थिती निर्माण झाली आहे. नालेसफाईचे पावसाळ्यापूर्वी नियोजन हे काम निरीक्षकामार्फत करून शहरातील नालेसफाई मोहीम राबवली गेली पाहिजे. सध्या शहरातील गटारी हे कचरा, गाळाने भरलेले असून वर्षभरापासून याकडे लक्षच दिले गेलेले नाही. असाच नगरपालिकेकडून शहर स्वच्छता व नालेसफाई बाबत कानाडोळा करण्यात आला तर धाराशिवकरांना आरोग्य समस्या उद्‌भवयाला वेळ लागणार नाही.

# परभणी येथे कृषी मेळाव्यास शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे : सिसोदिया

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**छत्रपती संभाजीनगर :** परभणी येथे वसंतराव नाईक



मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या ५२ व्या वर्धापन दिनानिमित्त विस्तार शिक्षण संचालनालय आणि कृषि विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने खरीप पीक परिसंवाद व कृषि प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सोयगाव तालुक्यातील व सावळदबारा परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सोयगाव कृषी विभागाच्या वतीने तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया यांनी केले आहे.

खरीपासाठी परभणी कृषी विद्यापीठाकडून १८/५)२४  मे ला बियाणे विक्री सुरु होणार असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय कुलगुरू डॉ. इन्द्र मणि हे राहणार असुन प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे मृद व जलसंधारण विभागाचे सचिव माननीय श्री सुनील चव्हाण (भाप्रसे) हे उपस्थित राहणार आहेत.

अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठचे माननीय कुलगुरू डॉ. शरद गडाख, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक माननीय रावसाहेब भागडे (भाप्रसे), परभणीचे जिल्हाधिकारी मा. रघुनाथ गावडे (भाप्रसे) आणि मुंबई येथील साविदा कृषि कं. प्रा. लि.चे अध्यक्ष विवेक दामले हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. वनामकृविचे शिक्षण संचालक डॉ. उदय खोडके, संशोधन संचालक डॉ. खिजर बेग, बिजोत्पादन संचालक डॉ. देवराव देवसरकर, पुणे येथील कृषि आयुक्तालयातील आत्माचे संचालक दशरथ तांभाळे, विभागीय कृषि सहसंचालक साहेबराव दिवेकर, डॉ. तुकाराम मोटे, कृषि परिषदेचे संशोधन संचालक डॉ. हरिहर कौसडीकर आणि फरीदाबाद (हरियाणा) येथील वॉव गो.ग्रीन.एलएलपीचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. शंकर गोयंका आदींची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यापीठ शास्त्रज्ञ लिखित विविध घडीपत्रिका, पुस्तिका, शेतीभाती मासिकांचे विमोचन करण्यात येणार आहे. यासह विद्यापीठ विकसित तंत्रज्ञान तसेच कंपन्याच्या आणि बचतगटाचे साहित्याचे कृषि प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरवात विद्यापीठ निर्मित बियाणे विक्रीने होणार आहे.

# उन्हाळ्यात ताजी फळे खा, ठणठणीत रहा

## डॉ. राहूल मेहेत्रे यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात उन्हाची तीव्रता जाणवू ही मे महिना असल्याने लागली आहे. तापमानाचा पारा वाढत असून हा कोणाला आला की सर्वांनी वेध लागतात ते टरबूज आणि खरबूज खाण्याचे बाजारामध्ये टरबूज आणि खरबूज ची मोठ्या प्रमाणात आवक सुरू झाली आहे, तसेच शेतकरी वर्गाचा मोठा प्रमानात नुकसान झाला होता.सोयगाव तालुक्यातिल उन्हाळ्यात रसाळ फळे डीहायडेशन वाचवण्यासाठी मदत करतात, त्यामुळे टरबूज खरबूज खा आणि ठणठणीत रहा असा सल्ला डॉ राहुल मेहेत्रे एमडी मेडीशन बुलढाणा यांनी दिला आहे. सध्या बाजारात ३० ते ४० रुपये किलो प्रमाणे उपलब्ध आहे तीन ते साडेतीन किलोपर्यंत फळे बाजारात आहे तर खरबूज ५० ते ६० रुपये किलोप्रमाणे उपलब्ध असून 2 ते अडीच किलो वजनाची फळे बाजारात विक्रीसाठी येत असल्याचे चित्र दिसत आहे, टरबूज का खावे? उन्हाळ्याच्या तपत्या ऊष्माघाताने शरीरातील पाण्याचे प्रमाण झपाट्याने कमी होते, टरबूज मध्ये पाण्याचे प्रमाण अधिक असते ते खाल्ल्याने पोटपण भरते आणि फॅट ही तयार होत नाही, टरबूज मध्ये विटामिन ए आणि सी, असते त्यामुळे शरीरातील रोगप्रतिकारशक्ती वाढते असल्याची माहिती डॉ. राहूल मेहेत्रे बुलढाणा यांनी



दिली. टरबूजसोबत खरबूज ही उपयोगि बहुतांश भागात लोक तरबूज पेक्षा खरबूज आवडीन खातात, एकीकड़े खरबूजचे भाग तरबूज पेक्षा दुपटीने वाढलेले असते, मात्र खाने वाले को दाम से कुछ लेन देन नही ? अशी म्हण सारखे चित्र दिसत खरबूजचे जबरदस्त फायदे आहेत. खरबूजमध्ये कॅल्शियम विटामिन सी, एंटीऑक्सीडेंट मोठ्या प्रमाणात असतात. यामुळे पोटाच्या अनेक आजाराला आळा तालुक्यातील अनेक भागातुन शेतकऱ्यांकडून व्यापारी वर्ग फळे घेऊन बाजारात येत आहे, उन्हाच्या तीवंत वाढत असल्याने फळानची मागणी पण वाढत आहे, मात्र बहुतांश ठिकाणी फळे लवकर पिकवण्यासाठी फळानवर औषधि वापरून वेगवेगळे प्रक्रिया केली जाते, मात्र असे केल्याने फळ हे धोखेदायक ठरते. त्यामुळे परिसरात चांगलेच व ताजे स्वच्छ फळे विकावे अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

**बसविण्याची शक्यता नकारता येत नाही :** निसर्गप्रत्येक मोसमात माणसाच्या गरजेनुसार फळे देत असतो शरीरात शरीरातील पाण्याची कमतरता होते त्यामुळे पाणीदार फळाचे सेवन आरोग्यदायी ठरते असल्याने टरबूज, नारळपानी, खरबूज, मोसंबी, चीकू, अनानस, या सारख्या फळया दिवसात खायला पाहिजे, कारण फळा मध्ये पाण्याचे प्रमान अधिक असते, उन्हाळाच्या दिवसात उषम तापमान असल्याने मानवी शरीरातील पानी पातळी ही झपाट्याने कमी होते, मात्र फळानमध्ये पाण्याचे प्रमाण आणि अनेक विटामिन असल्याने हे शरीराला मेनटेन ठेवते, तसेच फळे धुऊन स्वच्छ करून सामान्य तापमानावर तापमानावर आल्यावरच खाल्ल्यास फायदेशीर ठरतात, फळांना जास्त दिवस झाल्यानंतरचे फळ सेवन करू नये, ताजी फळे सेवन करण्यास प्रोत्साहन द्यावी, व ठंड पानी जास्तीत जास्त सेवन करावे.
**डॉ .राहूल मेहेत्रे एमडी मेडीशन मेहेत्रे हास्टपीटल बुलढाणा**

# सोयगाव तालुक्यात खरेदी -विक्रीचे व्यवहार ठप्प; शेतजमिनीशी संबंधित कामे बंद

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात महाभूमी पोर्टल तीन दिवसांपासून बंद सोयगाव महसूल विभागाच्या वतीने चालवली जाणारे महाभूमी पोर्टल तीन दिवसांपासून बंद आहे. त्यामुळे शेती आणि जमिनीशी सबंधित सर्व शासकीय, निमशासकीय कामे, खरेदी-विक्रीचे व्यवहार ठप्प झाले आहेत.महाभूमी पोर्टलवरून डिजीटल सातबारा, एकूण जमिनीचा दाखला ८-अ, फेरफार, मालमत्ता कार्ड. ई-रेकॉर्ड आदी डिजिटल सहीचे दाखले काढण्याच्या ऑनलाइन सुविधा शासनाने दिलेल्या आहेत. त्यामुळे तलाठी, भूमी अभिलेख, तहसील कार्यालयांवर असलेला भार कमी झाला होता. मात्र, रविवारी दुपारपासून महाभूमीचे पोर्टल लॉगिन होत नसल्यामुळे महा ई-केंद्रचालक, शेतकरी, विविध कार्यकारी सोसायटी, बँक खातेदार, खरेदी- विक्री करणारे आदी सर्वच जण त्रस्त झाले आहेत. यावर आधारित शासनाच्या विविध विभागांचा आणि बँकांचा लाखो रुपयांचा महसूलदेखील बुडत आहे. महाभूमीच्या डिजिटल सातबारा पोर्टलचे मुख्य नियंत्रण पुणे येथे असले तरीही त्या अनुषंगाने या साईटवर कोणताही हेल्प डेस्क क्रमांक किंवा मेल आयडी दिलेला नाही. त्यामुळे हे पोर्टल कधी चालू होणार किंवा काय अडचण आहे, याबाबत कोणालाही उत्तरे देता येत नाहीत, अशी माहिती महा ई-सेवा केंद्र चालक सुनील माकोडे सावळदबारा यांनी दिली.

**दोन दिवसांपासून मारतोय चकरा :** मला सोसायटीकडे वाढीव कर्जासाठी अर्ज करायचा आहे. त्यादृष्टीने आवश्यक सातबारा आणि एकूण जमिनीचा दाखला काढण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणच्या महा ई-सेवा केंद्रांवर चकरा मारून थकलो आहे, अशी माहिती त्रस्त शेतकरी प्रमोद कोते तालुका उपाध्यक्ष यांनी दिली.

# वीज पडून गाईचा मृत्यू; भरपाईची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे लोणी येथे दि.११ रोजी अचानक ककडकडती विज पडून गायीचा मृत्यू झाला. त्यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक आपत्ती ओढवली असुण तालुकास्तरीय महसूल प्रशासनाने याची नोंद दखल घेवून आर्थिक मदत मिळवून द्यावी असी मागणी गाय मालकासह नागरिकांनी केली आहे.

दि.११ रोजी मौजे लोणी येथे रात्री अचानक वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली त्यात विजेचा कडकडाट ढगाची गडगडाट सुरु होती. यात अचानक विजेच्या कडकडाट होत विज गायीवर कोसळली यात गाईचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. गायीचे मालक शेतकरी असद हुसेन पटेल यांनी धाव घेतली परंतु विजेच्या फटक्यानिशी मृत्य झाला गाय अंदाजे ३००००/- रुपायाची आहे. खुलताबाद तालुक्यात सध्या दुष्काळ सदृश्य परिस्थिती आहे व त्यात शेतकऱ्यांची गाय गेल्याने दुष्काळात तेरावा महिना म्हणण्याची वेळ आली आहे. तालुकास्तरीय महसूल विभागाने याची दखल घेऊन शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळवून देण्याची मागणी गाय मालकासह नागरिकांनी केली आहे.



# भोकर शहराला टँकरने पाणी; लवकरच नियमित पाणी पुरवठा

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** मागील आठवड्यापासून शहरातील कायमस्वरूपी पाणी पुरवठा योजनेला "सत्तरासेविघ्ण "लागल्याने शहराचा पाणीपुरवठा बंद झाला आहे.पाणी पुरवठा सूरळीत होई पर्यंत पालिकेनी नागरीकाची होणारी गैरसोय लक्षात घेऊन मंगळवारी (ता.१४ ) पासून टँकरने पाणीपुरवठा सुरू केला आहे.



शहरात कायमस्वरूपी पाणी पुरवठा योजना असल्याने नळाला नियमित पाणीपुरवठा केला जातो.ऊन्हाळा असो की पावसाळा पाणी पुरवठा कधीच खंडीत होत नाही. अपवाद वगळता एखाद्या वेळी एक दिवस पाणी पुरवठा बंद रहाते.त्यामुळे शहरातील नागरीक पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत समाधानी आहेत हे कुणी नाकारू शकत नाही.यार्षी ऊन्हाच्या प्रारंभी पासून निसर्गाचा बदलामुळे ऐन उन्हाळ्यात अवकाळी पाऊस, वादळीवाऱ्यासह गारपीट झाल्याने वीजपुरवठा खंडित झाला आहे. नागरीकांना रात्र अंधारात काढावी लागली. शहरातील पाणी पुरवठा हा सूधाप्रकल्पातुन केला जातो. येथील वीजपुरवठा खंडित झाला.त्या नंतर मोटार नादूरूस्त झाली लगेच त्यापाठोपाठ जलवाहिनी फूटली असे एकामागून एक विघ्ण लागले.पाच ते सहा दिवस पाणी पुरवठा बंद झाल्याने घोटभर पाण्यासाठी नागरीकांना वणवण भटकावे लागले. खासगी व शासकीय विंधन विहिरीवरील पाण्यावर तहान भागवावी लागली.याची दखल घेऊन पालीकेचे प्रभारी मुख्याधिकारी मारोती जगताप यांनी होणारी गैरसोय टाळण्यासाठी बुधवार पासून शहरात टँकरने पाणीपुरवठा सुरू केला आहे. लवकरच नियमित पाणी पुरवठा करण्यात येईल नागरीकांनी पालीकेला सहकार्य करावे असे आवाहन श्री.जगताप यांनी केले आहे.

# मोदींची नक्कल करणाऱ्या श्याम रंगीलाचा वाराणसीतून अर्ज फेटाळला

आधुनिक केसरी न्यूज

**वाराणसी :** विनोदी कलाकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींची नक्कल करून प्रसिद्ध झालेला श्याम रंगीला याने वाराणसी लोकसभा मतदारसंघातून लोकसभेचा उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र त्याचा अर्ज फेटाळण्यात आला आहे. रंगीला याने प्रतिज्ञापत्र सादर न केल्यामुळे त्याचा अर्ज फेटाळण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. वाराणसीतून उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी निवडणूक आयोगाने १४ मे ही अंतिम तारीख जाहीर केली होती. याच दिवशी श्यामने त्याचा उमेदवारी अर्ज दाखल केला होता, जो निवडणूक अधिकाऱ्यांनी फेटाळला आहे. वाराणसीत लोकसभा निवडणुकीच्या सातव्या टप्प्यात मतदान होणार आहे. श्याम रंगीला याला उमेदवारी अर्ज भरतानादेखील अनेक अडचणींचा सामना करावा लागला होता. "वारासणीत उमेदवारी अर्ज घेण्याची प्रक्रिया अतिशय क्लिष्ट आहे. त्यामुळे उमेदवारी अर्ज भरण्यात अडचणी येत आहेत. अनेक तास रांगेत उभा राहिल्यानंतर निवडणूक अधिकाऱ्यांनी मला आधार कार्ड आणि दहा प्रस्तावक (त्यांच्या स्वाक्षरीसह) आणि त्यांचे फोन नंबर आणण्यास सांगितले. त्यानंतरच अर्ज विकत घेण्यासाठी पावती दिली जाईल", अशी एक पोस्ट श्यामने एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर शेअर केली होती.

# पथदिवे कधी होणार प्रकाशमान..?

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहरातील मुख्य रस्त्यावर आणि गल्लीबोळात मागील वर्षभरापासून पथदिवे नसल्याने नागरीकांना अंधारात मार्ग काढावा लागतो आहे. नवीन बल्ब खरेदीसाठी पालिकेतील विद्युत विभाग उदासीन असल्याचे समजते. नागरीकांची होणारी गैरसोय दूर करावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.

शहराचा विस्तार मोठ्या प्रमाणात होत असल्याने पालीकेनी सर्वत्र वीजपुरवठा सूरळीत केला होता. सध्या प्रशासक नियुक्त असल्याने विकासकामे ठप्प झाली आहेत.शहरातील मुख्य रस्ते व गल्लीबोळात पथदिव्यांची दूरावस्था झाली आहे.ब-याच वसाहतीत पथदिवे बसविण्यात आले नाहीत,काही दिवस तर शहराच्या मुख्य रस्त्याचे देखील पथदिवे बंद होते. पालीकेच्या विद्युत विभागाने याकडे कानाडोळा केल्याचे समजते.मागील दिड वर्षांपासून खासगी कंत्राटदार नसल्याने स्वताह पालीकाच काम बघते आहे.यापूर्वी विद्युत खांबांची दुरुस्ती, पथदिवे बसवणे अशा कामासाठी कंत्राटदार नेमले जायचे मात्र मागील दीड वर्षापासून कंत्राटदार नसल्याने पालीकाच काम पाहते आहे. पथदिव्याच्या बाबतीत अनेक वेळा तक्रारी करूनही कुणीच लक्ष देत नाही.

नगरपरिषदेच्या निधीतून विद्युत विभागावर खर्च केला जातो.शहरात अंधार कसा?पथदिवे का बसविले नाही?वर्षभरात विद्युत विभागाने किती खर्च केला? देयके किती निघाले?शहरात किती ठिकाणी बल्ब बसविण्यात आले?खरेदी किती करण्यात आली? ह्या सर्व बाबी तपासून पाहिल्यास खरे माहिती उजेडात येईल.वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शहरातील पथदिवे सुरू करून नागरिकांची होणारी गैरसोय दूर करावी अशी जनतेची मागणी आहे.

# तालुक्यात कातळगाळ अभियान प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** निसर्गाचा मुड दिवसेंदिवस बदलत असल्याने त्याचा फटका पाणी टंचाईस बसतो आहे.पावसाचा पडलेला थेंब ना थेंब जमिनीत मूरावा म्हणून सेवा समर्पण परिवार व प्रशासनाच्या वतीने बूधवारी( ता. १५ )कातळगाळ अभियान सुरू करण्यात आले आहे.

कोळगाव (बुद्रूक ता. भोकर) येथे उपक्रमाची सुरुवात करण्यात आली असून जलसंधारणाचे कामे पुनर्जीवित करण्यात येणार आहेत.पाच वर्षापूर्वी टॅंकर मुक्त झालेल्या तालुक्यात या वर्षी पुन्हा टॅंकर सुरू करावे लागले.

जलसंधारण च्या कामात मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने गाळ काढणे गरजेचे असल्याचे लक्षात आल्यानंतर सेवा समर्पण परिवार व प्रशासनाने कातळगाळ अभियान हाती घेतले आहे.जलसंधारणाचे कामे पुनर्जीवित झाल्यानंतर या कामात पावसाचे पाणी साचून पाणी पातळीत वाढ होणार आहे. सदरील काम हे नियमित सकाळी ६:३० ते ९ पर्यंत श्रमदान करून केले जाणार आहे. मोठा पाऊस होईपर्यंत हे श्रमदान चालू राहणार आहे. या कातळगाळ अभियानात इतरांनी ही सहभागी होवून दोन तास श्रमदान करावे असे आवाहन सेवा समर्पण परिवार ने केले आहे. सदरील कार्यक्रमास महसूल विभागातील अधिकारी. वनपरिक्षेत्र अधिकारी प्रतिक मोडवान, गटविकास अधिकारी एम एन केंद्रे, सेवा समर्पण परिवार चे अध्यक्ष राजेश्वर रेड्डी लोकावाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

# राज्यात पुन्हा गारपिटीची शक्यता

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये गारपीट होण्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. त्यानुसार नगर आणि नाशिकमध्ये गुरुवारी मेघगर्जना आणि ताशी ५० ते ६० किलोमीटर वेगाने वाहणाऱ्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस आणि गारपीट होण्याचा अंदाज आहे. हवामान विभागाने नारंगी इशारा दिला आहे. मुंबई शहर, मुंबई उपनगरासह रायगड, ठाणे, पालघरमध्ये उष्णतेची लाटसदृश वातावरणाचा इशारा कायम आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, आज (गुरुवारी) राज्यभरात अवकाळी पावसाची शक्यता आहे. नगर आणि नाशिकला अवकाळी पावसासाठी नारंगी इशारा देण्यात आला आहे. नाशिक, नगरमध्ये वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा जोर राहणार आहे. शिवाय तुरळक ठिकाणी गारपीट होण्याचा अंदाज आहे. राज्यात तुरळक ठिकाणी स्थानिक परिस्थितीनुसार ताशी ४० ते ६० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग जास्त राहून पडझड आणि नुकसान होण्याचा अंदाजही व्यक्त करण्यात आला आहे. अरबी समुद्रातून बाष्पयुक्त हवा राज्यात येत आहे. त्यामुळे हवेत आर्द्रतेचे प्रमाण जास्त आहे.







# बुद्धिजीवी आंबेडकरी चळवळीचा कॉंग्रेसला पाठिंबा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** केंद्रातील मोदी सरकारकडून संविधान कुरतडल जात आहे. संविधान बाजूला ठेवून जनतेवर निर्णय थोपवले जात आहे. संविधानच राहिले नाही तर देशातील महापुरुषांचे पुतळे राहतील की नाही याची काळजी वाटते. मुस्लीमांची स्थिती दुय्यम नागरीकांची करुन ठेवली आहे. त्यामुळे भाजपला रोखण्यासाठी दलीत रिपब्लीकन आंबेडकरवादी,बुध्दीजीवी आणि चळवळीशी जोडले गेलेल्या मंचाने धुळ्यात महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ.शोभा बच्छाव यांना पाठींबा दिला असल्याची माहिती प्रा.बाबा हातेकर यांनी दिली आहे. धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात आज सकाळी ११ वाजता घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. त्यावेळी त्यांच्यासोबत हरिश्‍चंद्र लोंढे, प्रा.अनिल दामोदर, ॲड. सुरेश बागले, राहुल वाघ, किरण गायकवाड,प्रभाकर खंडारे आदी उपस्थित होते. यावेळी प्रा.बाबा हातेकर म्हणाले की, शनिवार दि.११ मे रोजी संध्याकाळी ५ वाजता संदेश भुमी येथे लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर दलीत, रिपब्लीकन, आंबेडकरवादी, डॉ.वकील,प्राध्यापक व बुध्दीजीवी आणि आंबेडकरी चळवळीशी जोडलेल्या कार्यकर्त्यांची एक विचारसभा आयोजीत करण्यात आली होती. याविचार सभेत भारताचे संविधान व संरक्षण हा चिंतेचा विषय असल्याचे म्हटले गेले. डॉ.आंबेडकरांनी दिलेल्या संविधानाचे रक्षण करण्यासाठी कोणाला आणि कसे रोखायचे यावर मंथन झाले. २०१४ ते २०२४ या काळात देशाची सत्ता भाजपच्या हातात आहे. या दहा वर्षात गरीबांची पिळवणूक, दलीत, वंचीत, आंबेडकरी जनता, एससी, एसटी, ओबीसींचे शोषण झाले आहे. आणखी पाच वर्ष भाजप सत्तास्थानी राहीले तर भारताचे डॉ.आंबेडकर लिखीत संविधान पूर्णतः रद्द केले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. एव्हढेच नव्हेतर कदाचीत २०२४ निवडणुक ही शेवटची ठरू शकते म्हणून भाजपला सत्तेपासून रोखण्यासाठी धुळे लोकसभा मतदार संघात इंडिया आघाडीच्या उमेदवार डॉ.शोभा बच्छाव यांना पाठींबा देण्याचे ठरविले. त्यानुसार आम्ही इंडिया आघाडीच्या उमेदवार डॉ.बच्छाव यांना पाठींबा देत असल्याचे प्रा.हातेकर यांनी सांगितले.



# ऊरुसाच्या धार्मिक उत्साहात सर्वांनी सहभाग नोंदवावा : उद्योजक मनोज पवार

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील देवगांव (रंगारी) उर्स् शरीफ शेख मारूफ बाबा संदल दिनांक 14 रोजी देवगांव (रंगारी) येथे उर्स.शरीफ शेख मारुफ बाबा यांचे संदल शरीफ साठी उद्योजक तथा समाजसेवक मनोज पुष्पाबाई केशवराव पवार यांनी बाबांच्या संदल च्या मिरवणूक मधे सहभाग होऊन बाबांची उरुसाचा आनंद घेतला व संदल च्या मिरुणुकीच्या बॅन्ड साठी 25000 रु. चे योगदान दिले, देवगावं (रंगारी) गावातील छ.शिवाजी महाराजांच्या व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुताळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन देखील केले तसेच ऊर्स कमिटी तर्फे उद्दोजक तथा समाजसेवक मनोज पवार यांचे जोरदार स्वागत देखील करण्यात आले त्या प्रसंगी देवगांव रंगारी गावातली सर्व हिंदू-मुस्लिम भाविक व उद्दोजक मनोज पवार मित्र मंडळ उपस्थित होते.

# चंद्रपुरात कॉफी पेंटिंग कार्यशाळेचे आयोजन

## महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था नागपूरचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** कालपरत्वे शैक्षणिक क्षेत्रात अनेक बदल घडत असून व्यवसायाची सुद्धा नवनवीन क्षेत्रे उदयास येत आहेत. याच पार्श्वभूमीवर महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था नागपूर ही आपल्या व्होकेशनल ट्रेनिंग सेंटर  च्या माध्यमातून महिलांसाठी नवनवीन अभ्यासक्रम घेऊन पुढे येत आहे. याच उपक्रमातील एक भाग म्हणून महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था नागपूर प्रकल्पाच्या एमकेएसएसएस व्होकेशनल ट्रेनिंग सेटर, देवनगर नागपूर द्वारे प्रथमतःच चंद्रपूर येथे कॉफी पैंटिंग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही कार्यशाळा 15 ते 35 या वयोगटातील महाविद्यालयातील विद्यार्थिनी, तरुणी, गृहिणी आणि पेंटिंग तसेच आर्ट अँड क्राफ्ट या क्षेत्राशी निगडित व्यवसाय सांभाळणाऱ्या महिलांकरिता घेण्यात येत असून या एक दिवसीय *कॉफी पेंटिंग* कार्यशाळेचे आयोजन दिनांक 18/05/2024 रोजी सायं. 5.00  ते 7.00 या कालावधीत आश्रय, सावरकर नगर, शासकीय दूध डेअरी च्या समोर चंद्रपूर येथे करण्यात आलेले आहे. सदर कार्यशाळे करिता प्रवेश शुल्क नाम मात्र शंभर रुपये आहे.

एमकेएसएसएस व्होकेशनल ट्रेनिंग सेटर च्या समन्वयक अश्विनी बुजोणे आणि याच केंद्राच्या प्रशिक्षक मेघा ठाकूर या अनुभवी तज्ज्ञा द्वारे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

या संदर्भात इच्छुकांनी अधिक माहीती करिता एमकेएसएसएस व्होकेशनल ट्रेनिंग सेटरच्या समन्वयक अश्विनी बुजोणे यांच्या 8983083492 या क्रमांवर संपर्क साधावा असे आवाहन महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था नागपूर द्वारे करणयात आले आहे.

# वामनदादा कर्डक हे आंबेडकरी चळवळीचे मुक्त विद्यापीठ होते : संतोष आगबोटे

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या



जीवनकार्यावर आधारित दहा हजारांहून अधिक गाणी लिहून याद्वारे समाजात सम्यक क्रांती पेरणारे आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळीतील महाकवी वामनदादा कर्डक हे आंबेडकरी चळवळीचे मुक्त विद्यापीठ होते असे प्रतिपादन आंबेडकरी साहित्य चळवळीचे अभ्यासक संतोष आगबोटे यांनी केले. त्यांनी सोशल मिडियावर आयोजित श्रद्धांजली कार्यक्रमात आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी सिद्धार्थ धुलध्वज, ॲड. संजय भारदे, अनुरत्न वाघमारे, प्रज्ञाधर ढवळे, धनराज गोडबोले, नानासाहेब पटाईत, विकी पाखरे, खुशाल गेडाम, रमेश कांबळे, राहुल जोंधळे आदींची उपस्थिती होती.

येथील सप्तरंगी साहित्य मंडळाच्या वतीने महाकवी वामनदादा कर्डक यांच्या २० व्या स्मृतिदिनानिमित्त श्रद्धांजली कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सोशल मिडियाचा यथायोग्य विधायक वापर केला तर जगभरातून चांगल्या विचारांची माणसं एकत्र येतात. यातून समाजाला नवी दिशा, नवा विचार देऊ शकतात. या हेतूने आवाहन करताच राज्यभरातून अनेकांनी वामनदादांना श्रद्धांजली वाहिली. आगबोटे म्हणाले की, अनेक कवी-गायक येतील जातील पण वामन दादा कर्डक यांची सर कोणालाही यायची नाही. सहज, सोपं, समर्पक, आशयपूर्ण, लोकभाषेतील शब्दरचना ही दादांची खासियत होती. त्यांनी आपले आयुष्य पणाला लावले. भीमा विचार तुझा पिंपळाचा पार आहे सुखाचे द्वार आहे, शीलाचे भांडार आहे. या गितातून ॲड. संजय भारदे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. तर विकी पाखरे यांनी खऱ्या अर्थाने वामनदादादांनी आपल्या गाण्यातून आणि प्रबोधनातून आंबेडकरी विचार जीवंत ठेवला आहे, हा विचार मांडला. कवी राहुल जोंधळे यांनी माझ्या वाहनांची कविता सादर करुन श्रद्धांजली वाहिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रज्ञाधर ढवळे यांनी केले व आभार नागोराव डोंगरे यांनी मानले. आयोजनासाठी पांडुरंग कोकुलवार, मारोती कदम, शंकर गच्चे, कैलास धुतराज, बाबुराव पाईकराव रुपाली वागरे वैद्य, रणजित गोणारकर, चंद्रकांत कदम यांनी परिश्रम घेतले.



# कारच्या धडकेत दुचाकीस्वार दोघे जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** भरधाव कारने धडक दिल्याने दुचाकीस्वार दोघे जखमी झाल्याची घटना १४ मे रोजी स्थानिक चैत्रबन हॉटेल समोर  घडली. याबाबत आज १५ मे रोजी पोलिसांनी कार चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला.

सदर अपघात प्रकरणी पोलीस सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार फिर्यादी यांचे पुतणे नामे आकाश म्हस्के व त्याचा मित्र गौरव मेटकर हे वाघरुळ येथून दुचाकी क्रमांक एम एच २८ ए वाय ६५०४ ने घरी गिरोली खुर्द येथे येत असताना देऊळगाव राजा ते जालना मार्गावरील चैत्रबन हॉटेल समोर स्विफ्ट कार क्रमांक एम एच २० जीई ४०५९ क्या चालकाने भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने कार चालवून दुचाकीस धडक दिली. या अपघातात आकाश म्हस्के व गौरव मेटकर दोघे जखमी झाले. दिलीप श्रीराम म्हस्के वय ५८ रा. गिरोली खुर्द यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी कार चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.बीट जमादार रामेश्वर जायभाये तपास करीत आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# अर्थसंकल्पाची फाळणी करण्याचा काँग्रेसचा डाव !

## नाशिकच्या सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा गौप्यस्फोट

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** या निवडणुकीत काँग्रेसचा दारूण पराभव होणार असून मान्यताप्राप्त विरोधी पक्षाचे स्थान देखील त्यांना मिळणार नाही. कदाचित त्याची जाणीव झाल्यामुळेच आता महाराष्ट्रातील एका नेत्याने आपली दुकाने बंद करून काँग्रेसमध्ये विलीन होण्याचा सल्ला विरोधी पक्षांना दिला असून महाराष्ट्रातील नकली शिवसेना, नकली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष निवडणुकीनंतर काँग्रेसमध्ये विलीन होतील, असे भाकित पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी पिंपळगाव बसवंत (जि. नाशिक) येथे झालेल्या विराट विजय संकल्प सभेत बोलताना वर्तविले. धर्माच्या आधारावर देशाच्या अर्थसंकल्पाचीही फाळणी करण्याचा काँग्रेसचा डाव आहे, असा गंभीर आरोपही श्री.मोदी यांनी केला. भाजपा-महायुतीच्या दिंडोरीच्या उमेदवार डॉ.भारती पवार, नाशिकचे उमेदवार हेमंत गोडसे यांच्या प्रचारार्थ झालेल्या या सभेत पंतप्रधान मोदी यांनी काँग्रेस, उद्धव ठाकरे यांची शिवसेना व शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची जोरदार खिल्ली उडविताना कांदा, द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्यांवर सखोल मुक्त चिंतन केले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, पालकमंत्री दादा भुसे, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ.भागवत कराड, महसूल मंत्री राधा कृष्ण विखे पाटील, ग्रामीण विकास मंत्री गिरीश महाजन, आ.डॉ.राहुल आहेर आदी यावेळी उपस्थित होते. तुमची सेवा हेच माझ्या आयुष्याचे सर्वात मोठे ध्येय आहे. गेल्या दहा वर्षांत तुम्ही माझे काम पाहिले आहे, आज तिसऱ्या कार्यकालात विकसित भारत बनविण्यासाठी आशीर्वाद मागण्याकरिता मी



तुमच्यासमोर आलो आहे, असे सुरुवातीसच सांगून श्री.मोदी यांनी देशाच्या विकासाच्या वाटचालीचे गेल्या दहा वर्षांचे एक चित्र जनतेसमोर सादर केले. भाजपा -एनडीए आघाडीला प्रचंड विजय मिळणार याची जाणीव इंडी आघाडीच्या एका नेत्याला अगोदरच झाली आहे, असे शरद पवार यांचा नामोल्लेख न करता मोदी म्हणाले. निवडणुकीनंतर सारेजण एकत्र आले तर कदाचित मान्यताप्राप्त विरोधी पक्षाचे स्थान मिळू शकेल, असा त्या नेत्याचा समज आहे. नकली शिवसेना, नकली राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सामील होणार हे नक्की आहे. जेव्हा ते घडेल, तेव्हा मला बाळासाहेबांची आठवण नक्कीच होईल. जेव्हा आपला पक्ष काँग्रेससोबत जाईल, तेव्हा मी शिवसेनेचे दुकान बंद करेन असे बाळासाहेब ठाकरे म्हणत असत. हे दुकान बंद होण्याची वेळ आली, असा याचा अर्थ आहे. विनाशाचा हा क्षण बाळासाहेबांना क्लेश देणारा असेल, कारण नकली शिवसेनेने बाळासाहेबांची सारी स्वप्ने धुळीस मिळविली आहेत. अयोध्येत भव्य राममंदिर व्हावे, जम्मू काश्मीरमधील कलम 370 रद्द व्हावे, ही बाळासाहेबांची स्वप्ने होती. ती पूर्ण झाली, पण याचा सर्वाधिक विरोध नकली शिवसेनेकडून सुरू आहे, असे श्री.मोदी म्हणाले. नकली शिवसेनेप्रमाणे नकली राष्ट्रवादीनेही राम मंदिर प्रतिष्ठापनेचे निमंत्रण झिडकारले. काँग्रेस आणि नकली शिवसेना यांच्यात पापाची भागीदारी असून संपूर्ण महाराष्ट्रासमोर हे पाप उघड झाले आहे, असे ते म्हणाले. ज्या काँग्रेसने वीर सावरकरांना सतत अपमानित केले, त्या काँग्रेसला खांद्यावर घेऊन नकली शिवसेना राजकारण करत आहे, असा आरोप श्री.मोदी यांनी केला. महाराष्ट्रातील जनतेचा संताप शिगेला पोहोचला आहे, पण नकली शिवसेनेला अहंकारामुळे याची जाणीवही झालेली नाही. काँग्रेससमोर गुडघे टेकणाऱ्या नकली शिवसेनेला धडा शिकविण्याची स्वाभिमानी महाराष्ट्राची तयारी झालेली आहे, असेही ते म्हणाले.आज आम्ही गरीबांना मोफत धान्य, पक्की घरे, घराघरात वीज, पाणी, गॅस जोडणी देत आहेत. आम्ही कधीही कोणाचा धर्म पाहिला नाही, कोणाचा धर्म विचारला नाही. सर्वांसाठी योजना बनविल्या जातात, आणि त्याचा लाभ सर्वांना समान रीतीने दिला जातो. पण काँग्रेसची नियत ठीक नाही. देशाच्या अर्थसंकल्पातील 15 टक्के रक्कम केवळ अल्पसंख्याकांसाठी खर्च करावी असा काँग्रेसचा विचार आहे. धर्माच्या नावाने त्यांनी देशाचे विभाजन घडविले, आजही धर्माच्या नावाने अर्थसंकल्पाचे विभाजन करण्याचा तोच डाव पुन्हा खेळला जात आहे. काही वर्षांपूर्वी काँग्रेसने अर्थसंकल्पाचे वितरण धर्मानुसार करण्याच्या प्रस्तावास हिरवा झेंडा दाखविला होता. हा केवढा धोकादायक विचार आहे, पण काँग्रेसकरिता अल्पसंख्याक म्हणजे केवळ त्यांची मतपेढी आहे. मी मुख्यमंत्री असताना काँग्रेसच्या या प्रस्तावास जोरदार विरोध केला होता. देशाच्या अर्थसंकल्पाची 15 टक्के रक्कम केवळ मुस्लिमांकरिता खर्च करण्याचा काँग्रेसचा विचार होता, पण भाजपाच्या प्रखर विरोधामुळे तो यशस्वी झाला नाही. आता तोच जुना अजेंडा पुन्हा लागू करण्याचा काँग्रेसचा डाव आहे, असा आरोपही त्यांनी केला. काँग्रेसच्या सत्ताकाळात महाराष्ट्रातीलच नेता केंद्रात कृषीमंत्री होता, पण त्या सरकारने शेतकऱ्यांची काळजी घेतली नाही. आज किसान सन्मान निधीतून दर वर्षी प्रत्येक शेतकरी कुटुंबास महाराष्ट्रात वर्षाकाठी 12 हजार रुपये मिळतात. काँग्रेसच्या काळात केवळ खोटी पॅकेज जाहीर होत होती. त्यापैकी एक रुपया देखील शेतकऱ्यास मिळत नव्हता, आम्ही शेतकरी हितास सर्वोच्च प्राधान्य दिले, अशी ग्वाही श्री. मोदी यांनी दिली. गेल्या हंगामात सात लाख टन कांदा खरेदी केला, आमच्या सरकारने पहिल्यांदा त्याच्या साठवणुकीची व्यवस्था केली, गेल्या दहा वर्षांत कांद्याची निर्यात 35 टक्क्यांनी वाढली आहे. दहा दिवसांपूर्वी कांदा निर्यातीवरील निर्बंध हटविले असून दहा दिवसांत 22 हजार टन कांदा निर्यात झाला आहे. कांद्याच्या वाहतुकीवर सबसिडी देण्याची योजना लागू करण्यात येत आहे. क्लस्टर विकास योजनेचा लाभ द्राक्ष उत्पादकांना होईल. लोककल्याणाची अशी हमीपूर्ण कामे करण्यासाठी भाजपा-रालोआच्या उमेदवारांना विजयी करून देशाचे, भावी पिढ्यांचे भविष्य सुरक्षित करा, असे आवाहन अखेरीस पंतप्रधानांनी केले.

## सीबीएसई बोर्ड परीक्षेत विद्यार्थ्यांचे यश

आधुनिक केसरी न्यूज







**देऊळगांवराजा :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या बोर्ड परीक्षेत राजलक्ष्मी इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त करून यशाची परंपरा कायम राखली आहे.

दहावीच्या बोर्ड परीक्षेत तृप्ती शिंगणे हीने ९४.८ टक्के गुण घेऊन विद्यालयातून अव्वल स्थान मिळवले आहे. तर अनुष्का वाघमारे ही ९४.४ टक्के गुणासह व्दितीय व शलाका खरात ९४.२ टक्के गुण घेऊन तृतीय स्थान मिळविले आहे. तसेच मंदार पेटकर ८६ टक्के, वेदश्री ८५.५ टक्के, शुभम नागरे ८२.४ टक्के , सृष्टी दूनगहू ८१ टक्के , प्रज्वल डोईफोडे ८०.२ टक्के , रितू राठोड ७७ टक्के आणि दुर्व पेटकर ७६.८ टक्के गुण घेऊन प्राविण्य श्रेणीत उत्तीर्ण झाले आहे. विशेष म्हणजे तृप्ती शिंगणे या विद्यार्थिनीने कोणतेच खाजगी शिकवणी क्लास न लावता तिची पुढील शिक्षणासाठी बाहेरच्या क्लासेस मध्ये शिष्यवृत्ती साठी निवड झाली आहे.तर शाळेच्या विद्यार्थांनी बाहेर कोणतीच खाजगी शिकवणी न लावता स्वंय अध्ययनावर भर दिले व अथक परिश्रमातून शाळा व्यवस्थापन तसेच शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली हे यश मिळविले आहे. परिसरातील सर्वच स्तरातून या गुणवंतांवर कौतुक होत आहे. संस्थेच्या अध्यक्षा डॉ. मीनलताई शेळके , सचिव डॉ. रामप्रसाद शेळके यांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहे.शाळेचे विद्यार्थ्यांची प्रगती घडवण्यासाठी स्वतःला झोकून देणाऱ्या आणि १०० टक्के निकाल मिळवणाऱ्या शिक्षकांच्या प्रयत्नांची व्यवस्थापनाने प्रशंसा केली. पुढाकार घेणाऱ्या शिक्षक कर्मचाऱ्यांमध्ये सुजित गुप्ता, बाळासाहेब गोजरे, आदेश शर्मा, फैसल उस्मानी,आकाश अग्रवाल,खूबचंद वर्मा, कुलदीप सिंग यांचा समावेश आहे.

## सुरज शेख याचे बारावी सीबीएससीत यश

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** सुरज नूरा शेख मु.जासई. याने सीबीएससी बारावी परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. तो टी.एस.रहमान, न्हावे.या विद्यालयात शिकत होता, कोणताही क्लास न लावता त्याने ८० % गुण प्राप्त केले आहेत.सुरज चे पालक नूरा हसन शेख हे रयत शिक्षण संस्थेत शिक्षक असून ते रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक आणि दी रयत सेवक को ऑपरेटिव्ह बँक, सातारा चे मा.व्हॉईस चेअरमन आहेत,सुरजने या यशाचे श्रेय आपले आई वडील आणि शिक्षकांना दिले आहे. त्यास पुढे कॉम्पुटर सायन्स या फिल्ड मध्ये उच्च शिक्षण घ्यायाचे आहे. त्याच्या या यशाचे अभिनंदन रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग, अध्यक्ष सुरेश पाटील, रयत सेवक को ऑपरेटिव बँक साताराचे स्वीकृत संचालक आणि गुरुकुल प्रमुख संतोष ठाकरे यांनी केले असून त्याचे ग्रामस्थ,नातेवाईक व सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## चिरनेर येथे छत्रपती संभाजी महाराज जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** छावा प्रतिष्ठान चिरनेर, युद्धनौका ग्रुप, ग्रामस्थ मंडळ चिरनेर यांच्या संयुक्त विद्यमाने उरण तालुक्यातील चिरनेर कातळपाडा येथे श्री छत्रपती संभाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात संपन्न झाली. संपूर्ण रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्या मोठ्या उत्साहात साजरी केली जाणारी श्री छत्रपती संभाजी महाराज जयंती हि एकमेव आहे. यंदा जयंतीचे हे १० वे वर्ष आसल्याची माहीती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ऍड.सुभाष कडू यांनी दिली.सकाळी ९ वा. श्री छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन, सकाळी १० वा. छत्रपती संभाजी महाराजांचा जन्मोत्सव,१२ वाजता सत्यनारायणाची पूजा करण्यात आली. त्यानंतर सायंकाळी ५ वाजता छत्रपती संभाजी महाराजांची पालखी शिव प्रेमी, समस्त शिवभक्त, ग्रामस्थ मंडळ चिरनेर उरण, भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली.यावेळी महिलांनी नववारी तर पुरूषांनी कूर्ता पायजमा व डोक्यावर फेटा असा पारंपारीक साज केला होता.तर स्थानीक महिला मूलींनी लेझीम वर ताल पकडला होता.पुष्प वृष्टी व टाळ मृदूंग व घोषणा देत पालखी काढण्यात आली होती. या कार्यक्रमाला काँग्रेस रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, बोरखारचे उद्योजक तेजस डाकी, राष्ट्रवादी काँग्रेसचे उरण विधानसभा अध्यक्ष



वैजनाथ ठाकूर, जिल्हा परिषद सदस्या कुंदा ठाकूर, चिरनेरचे सरपंच भास्कर मोकल,उद्योजक माणिक म्हात्रे,तंटामुक्ती अध्यक्ष अलंकार परदेशी, पंचायत समितीच्या माजी उपसभापती शुभांगी पाटील,उद्योजक गोरख ठाकूर,आजी माजी ग्रामपंचायत सदस्य व परिसरातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी सर्व शिवभक्तांनी पालखी सोहळ्यास उपस्थित राहून छत्रपती संभाजी महाराजांना मानवंदना दिली.व दिवसभरातील विविध धार्मिक कार्यक्रमांचा लाभ शिवभक्तांनी घेतला. कार्यक्रमाचे उत्तम आयोजन, नियोजन केल्याने शिवभक्तांनी, विविध सामाजिक संघटनानी सदर उपक्रमांचे, नियोजनाचे कौतुक केले.छावा प्रतिष्ठानच्या सर्व पदाधीकारी ,सदस्य व ग्रामस्थ चिरनेर यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर